# संपादकीय

## संमेलनातील ग्रंथस्टॉलांची आखणी आकर्षक हवी

इंदूर येथील साहित्य संमेलन हे मोजकी उपस्थिती, सुविहित कार्यक्रम, नेटके संयोजन यामुळे लक्षवेधक ठरले. ग्रंथविक्री मात्र फारच कमी झाली. इंदूरला अडीच लाख मराठी भाषकांची वस्ती आहे. सुखवस्तू मध्यमवर्गीयांची संख्या जास्त आहे. त्यामुळे संमेलनात ग्रंथविक्री मोठ्या प्रमाणावर व्हावी अशी अपेक्षा होती. परंतु स्थानिक पातळीवर प्रचार पुरेसा झाला नाही; त्यामुळे संमेलनस्थळी इंदूरकरांची उपस्थिती तुरळकच राहिली. ग्रंथदिंडी पाच किलोमीटर अंतर चालून आली; मराठी भाषक वस्तीतून ती प्रामुख्याने फिरवण्यात आली. जागोजागी तिचे छान स्वागत झाले. परंतु प्रत्यक्ष संमेलनात मात्र गर्दी कमीच राहिली. बाहेरून आलेल्या प्रतिनिधींचीच संख्या प्रेक्षकवर्गात अधिक राहिली. किमान पाचसातशे प्रतिनिधी असे आहेत की जे सहसा संमेलन चुकवत नाहीत. अडीअडचणींचा बाऊ न करता ते संमेलनात हजर राहतात; मग ते संमेलन कुठेही असो. पंढरीच्या वारकऱ्यांप्रमाणे त्यांची ही वारी असते. एकेक प्रतिनिधी हजार-दोन हजार रुपये खर्च करून संमेलनाला हजर राहतो, तेव्हा त्याच्या पदरी काहीतरी मौलिक विचारधन पडायला हवे, नव्याजुन्या साहित्यिकांना भेटण्याचा-ऐकण्याचा आनंद त्याला मिळायला हवा.

इंदूरच्या साहित्य संमेलनाने फारच थोड्या लेखक-कवींना सामावून घेतले. अनेक लोकप्रिय लेखकांना बोलावण्याचे टाळले. इंदूरमधील अनेक साहित्यिकांनाही दूर ठेवले. आयोजनात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या सानंद या संस्थेचा सहभाग कार्यकर्त्यांच्या पातळीवर लक्षणीय व शिस्तबद्ध होता. परंतु स्थानिक लेखक-कवींना सामावून घेतले गेले नाही. स्थानिक लेखक-कवींना दूर ठेवण्याच्या प्रवृत्तीमुळे अनेकांची नाराजीही दिसून आली. सर्वसामान्य इंदूरकरांचा प्रतिसाद अधिक मोठ्या प्रमाणावर असायला हवा होता. बेळगाव व इंदूर या दोन्ही संमेलनांचे आयोजक हे राजकारणाच्या आहारी जाऊन स्थानिक साहित्यिकांशी फटकून राहण्यात आपला मोठेपणा मानत राहिले. त्याचबरोबर प्रचारात कमी पडले. त्यामुळे स्थानिक लोकांची उपस्थिती कमी राहिली. बेळगावला मंडपात चार हजार खुर्च्या होत्या. इंदूरला त्या फक्त १२०० होत्या. स्टेडियमला गॅलरी असली तरी त्या गॅलरीत उद्घाटनाच्या वेळीही तीन-चारशे माणसेच होती. फक्त एका करमणुकीच्या कार्यक्रमाला हाऊस फुल्ल गर्दी झाली.



बाकी कार्यक्रमांना १२०० पैकी निम्म्या अर्ध्या खुर्च्या रिकाम्याच असत.

पुस्तकांच्या स्टॉलची रचना चुकीची होती. त्यामुळेही पहिल्या दर्शनी स्टॉल्सवरच काय ती थोडीफार गर्दी राहिली. पुढच्या ओळीपलीकडील स्टॉलकडे ग्राहक फारसे वळलेच नाहीत. एकेका स्टॉलसाठी प्रकाशकाचा दहा-वीस हजार रुपये तरी खर्च होतो; त्या प्रमाणात विक्रीची अपेक्षा असते. इंदूरला बहुतेक ग्रंथ स्टॉलधारकांना त्यामुळे फटकाच बसला.

पुढच्या आयोजकांनी याबाबत अधिक साक्षेपीपणा दाखवण्याची गरज आहे. महामंडळीचीही याबाबत भूमिका केवळ बघ्याची असते. स्टॉल रचनेच्या काही प्राथमिक गरजांचीही पूर्तता होत नाही; इतक्या वर्षांच्या अनुभवानेही आपण काही शिकत नाही या गोष्टीची ती निदर्शक आहे. एखाद्या जिल्हा संमेलनाच्या पातळीवर अ. भा. साहित्य संमेलनाला आणून ठेवू नये.


## 'अक्षरधारा'चे अभिनंदन

'अक्षरधारा' तर्फे शंभरावे ग्रंथप्रदर्शन पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथील मैदानात ५ जानेवारीपासून सुरू आहे. ते दीड महिना चालणार आहे. ३६०० चौ. फूट शामियान्यात ग्रंथांची नीटनेटकी विषयवार मांडणी करण्यात आली असून दररोज साहित्यचर्चात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमही ठेवण्यात आले आहेत.

रमेश राठिवडेकर यांनी अक्षरधाराच्या निमित्ताने गेल्या पाच-सहा वर्षांत सबंध महाराष्ट्र ढवळून काढला आणि वेगवेगळ्या शहरी ताजी मराठी पुस्तके रसिक-वाचक ग्राहकांना सहजपणे उपलब्ध करून दिली. ग्रंथ प्रदर्शनाला जोडून वाङ्मयीन कार्यक्रम, मुलाखती, परिसंवाद, चर्चा वगैरे घडवून, त्या त्या ठिकाणी वातावरण निर्मिती व्हावी असाही प्रयत्न केला. पत्रकारांशी सतत संपर्क ठेवून ग्रंथ प्रदर्शनविषयक जागृती जनसामान्यांत व्हावी यासाठीही दक्षता दाखवली. पु. ल. देशपांडे यांच्या संपूर्ण साहित्याचा संच सवलतीत देऊन प्रचंड उलाढाल करण्याची कल्पकताही त्यांनी दाखवली.

अक्षरधारामुळे एकूणच ग्रंथांच्या वेगवान वितरणाला मोठीच चालना मिळाली. यासारखीच ग्रंथप्रदर्शने भरवणाऱ्या साहित्ययात्रा, ग्रंथसागर, शुभम साहित्य वगैरे संस्थाही आता कार्यरत आहेत. पुण्यामुंबईच्या दुकानातच बंदिस्त राहणारी पुस्तके आता महाराष्ट्रभर वाचकापर्यंत जाऊ लागली आहेत. याचे श्रेय या सर्व प्रदर्शन-आयोजक संस्थांना व ग्रंथप्रेमी विक्रेत्यांना दिले पाहिजे. आम्ही या सर्वांचे अभिनंदन करतो. त्यांना शुभेच्छा देतो.

-संपादक



## साहित्यवार्ता

### नवी ऑक्सफर्ड डिक्शनरी येते आहे!

इंग्रजी भाषा आणि तिची शब्दसंपदा याबाबत अंतिम शब्द समजल्या जाणाऱ्या ऑक्सफर्ड डिक्शनरीची नव्याने रूढ झालेले शब्द सामावून घेण्यासाठी व्यापक प्रमाणात फेररचना केली जात आहे. या डिक्शनरीच्या आजवरच्या इतिहासामध्ये तिची फेररचना केली जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. या संपूर्ण प्रकल्पावर ३५ दशलक्ष पौंड खर्च येणार असून तो इ.स. २०१० पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती तिचे मुख्य संपादक जॉन सिम्सन आणि तिच्या ऑनलाईन विक्रीयंत्रणेच्या व्यवस्थापक सुसान लोबो यांनी दिली.

यापूर्वी या डिक्शनरीमध्ये केवळ नवे शब्द समाविष्ट केले जात असत. परंतु यावेळी नव्या शब्दांच्या समावेशाबरोबरच तिच्यामध्ये आजवर समाविष्ट असलेल्या प्रत्येक शब्दाचे साकल्याने परीक्षण केले जाणार आहे. तसेच काही शब्दांच्या व्याख्या, त्यांची व्युत्पत्ती तसेच त्यांचे उच्चारण यामध्ये नव्याने जे काही संदर्भ हाती आले आहेत, त्यांचाही अंतर्भाव नव्या केला जाणार आहे.

विविध भाषांतून नव्या आवृत्तीत शब्द समाविष्ट केले जाणार आहेत. हिंदी भाषेतील मुहूर्त, मैदान, मंझील, मैथिली यांचा समावेश आहे. एवढेच नव्हे तर या शब्दांच्या व्युत्पत्तीचा समावेशही त्यांच्यात असेल. तसेच इंग्रजी भाषेत लेखन करणारे आणि जागतिक स्तरावर मान्यता पावलेले भारतीय लेखक अमिताव घोष, नलिनाक्ष भट्टाचार्या, फिरदौस कांगा यांचा समावेश त्यात आहे. या डिक्शनरीच्या पुर्नरचनेचा आणि नूतनीकरणाचा हा प्रकल्प जगातला या स्वरूपाचा सर्वात मोठा असा प्रकल्प आहे. त्यासाठी १२० भाषातज्ज्ञ तसेच संशोधन सहाय्यक आणि विविध भाषांवर प्रभुत्व असणारे ३०० तज्ज्ञ यांचे योगदान लाभणार आहे. हा प्रकल्प १९९३ पासून सुरू झाला आहे. १८५७ मध्ये प्रथम तिच्या निर्मितीचे कार्य हाती घेण्यात आले. १९२८ मध्ये तिची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. तेव्हापासून ही डिक्शनरी इंग्रजी भाषेतील कोणत्याही शब्दाचा अचूक अर्थ त्याचे अचूक उच्चारण आणि त्याची व्युत्पत्ती याबाबत मानदंड समजली जाते. या डिक्शनरीत जगातल्या प्रमुख भाषांतील २५ लक्ष वाक्यांचे इंग्रजीतील भाषांतरही समाविष्ट आहे. १९८९ मध्ये तिची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. दरम्यानच्या काळात तिची ऑन लाईन आवृत्ती नेटवर उपलब्ध झाली. त्यात दर तीन महिन्यांनी नवे शब्द किंवा त्यांचे नवे अर्थ समाविष्ट केले जातात. मार्च २००० मध्ये या डिक्शनरीत १००० नवे शब्द व २००० शब्दांबाबतच्या नव्या नोंदी केल्या गेल्या



### माझी गाणी तीन पिढ्या ऐकतात हे माझे भाग्य

'आजपर्यंत मला रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. माझी गाणी तीन पिढ्या ऐकतात हे माझे भाग्य समजतो. एकाग्रता, जिद्द व निष्ठा असणारा माणूस कधीही अयशस्वी होत नाही,चालणाऱ्या माणसाने मैलाच्या दगडाकडे कधीही बघू नये' असे जगदीश खेबुडकर यांनी स्पष्ट केले. त्यांनी २७०० गीते लिहिली आहेत. त्यात ४५० लावण्यांचा समावेश आहे. १९४८ साली लिहिलेली 'मानवते तू विधवा झालीस' ही पहिली कविता म्हणजे आपल्या काव्यजीवनाची सुरुवात असे त्यांनी सांगितले.

### स्त्रीशक्तीची ओळख करून देणे आवश्यक

साहित्याकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पाहताना लोकसाहित्यातील स्त्रियांच्या अस्मितेचा उच्चार करणाऱ्या प्रवाहाचा, स्त्रीच्या शक्तीची ओळख करून देणाऱ्या परंपरेचाही विचार करायला हवा, असे मत प्रसिद्ध लेखिका, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले.

'भारतीय स्त्रीशक्ती' आयोजित 'वागीश्वरी २०००' या संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. 'साहित्याकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पाहावे का?' या परिसंवादात डॉ. ढेरे म्हणाल्या, ''या देशात स्त्रियांवर अन्याय करणारी परंपरा आहे; तशीच स्त्रीच्या शक्तीची ओळख करून देणारी बुद्ध,चार्वाकाची परंपरा आहे. वर्षानुवर्षे बाई बोलली नाही, म्हणजे तिला 'स्व'त्वच नव्हते, असे नाही. मौखिक लिखित स्वरूपातील लोकसाहित्यातून स्त्रियांच्या अनुभवांचे, व्यथा-वेदनांचे दर्शन घडते. स्त्रियांनी नवरा, दीर, सासऱ्याबद्दलची मते स्पष्टपणे मांडलेली दिसतात. पुरुषसत्ताक जगावर त्या टीका करतात. आधुनिक साहित्यात ही धिटाई व परखडपणा का नाही, हा प्रश्न वाचकांनी उपस्थित करावा. सावित्रीच्या कथेतून सावित्रीचा वर निवडण्याची स्वयंनिर्णयाची ताकद, सत्यवानाचे प्राण परत आणण्याच्या जबाबदारीचे भान लक्षात येते. साहित्याकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून बघताना परंपरेचा पुनर्विचार करायला लागल्यावर वेगळे पैलू लक्षात येतात.

मीना वैशंपायन यांनी म्हटले : साहित्याकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे; तशी गरजच आहे. स्त्रीवादाचा अर्थ, त्याची जडणघडण, पाश्चात्य विचारवंत-कार्यकर्त्यांची मते यांचा वेध घेतला, तर लक्षात येते की स्त्रिया लिहायला लागल्या त्याला शंभर वर्षे उलटली. तरीही पुरुषांच्या कल्पनेतून, विशिष्ट मानसिकतेतून लेखन होते. स्त्रीच्या साचेबंद, पारंपरिक रूपाचेच चित्रण होते. बहुजिनसी स्त्रीवादी तत्त्वप्रणालीच्या आधारे साहित्याकडे पाहिल्यास वेगळी जाणीव विकसित होईल; स्त्रियांच्या नातेसंबंधांचे स्वरूप दाखविणाऱ्या, आत्मभानाची ओळख करून देणाऱ्या सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर यांच्या लेखनाचा उल्लेख करायला हवा. प्रा. विजय तापस यांनी अवघ्या समाजव्यवस्थेकडेच स्त्रीवादी दृष्टिकोनातून बघण्याची गरज व्यक्त केली. समाजव्यवस्थेत लोकसंख्येने निम्म्या असलेल्या स्त्रियांचे शिक्षण, आरोग्य, जन्म-मृत्यू दर, त्यांचा दर्जा, त्यांची दयनीय अवस्था यांबाबतची आकडेवारीच त्यांनी सादर केली. स्त्रीवादाची चर्चा नसताना इंदिराबाईंच्या कवितेतून दिसणारे स्त्रीच्या मनोव्यापारांचे दर्शन मनोज्ञ आहे.

नयना सहस्रबुद्धे यांनी 'भारतीय स्त्रीशक्ती'ला अपेक्षित असलेल्या स्त्रीवादाचे स्वरूप सांगितले. ''स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष समानता, समान प्रतिष्ठा, समान संधी देणारे माणूसपणाचे तत्त्वज्ञान आहे. साहित्यात मात्र स्त्रीचे व्यक्ती म्हणून असणारे स्थान, भाषाशैली, नातेसंबंध दुर्लक्षित राहिले. कारण साहित्य स्त्रीप्रधान होते; पण स्त्रियांचे प्रश्न, अनुभव त्यात नव्हते. आगामी काळात साहित्यातून स्त्रीच्या आत्मभानाचे दर्शन घडले पाहिजे.

कवी संमेलनात आसावरी काकडे, संजीवनी बोकील, ज्योती चिंचणीकर, संगीता बर्वे, अंजली कुलकर्णी आणि सुलभा हेर्लेकर यांनी भाग घेतला. दोन दिवसांच्या या संमेलनासाठी धुळे, मुंबई, नागपूर, अमरावती येथून वाचकमंचाच्या सव्वाशे सदस्या आल्या होत्या.

## उर्मीतून वाचन वाढते– विश्वास पाटील

'पदवीचा व वाचनाचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. कारण वाचन हे मनातून व्हावे लागते. उर्मीतून वाचन वाढते', असे उद्गार 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी काढले.

नॅशनल बुक ट्रस्टच्या 'राष्ट्रीय पुस्तक मेळ्यात विश्वास पाटील यांच्याशी मीना वैशंपायन व 'झिनझिनाट' फेम महेश केळुस्कर यांनी अनौपचारिक गप्पा मारल्या. भाषा, संस्कार, साहित्य वाचन अशी विविधांगी चर्चा यावेळी झाली.

श्री. पाटील म्हणाले, 'झाडाझडती, सागळ यासारखे शब्द तसेच पत्ता कानात साठवला, रानमातीत वीज इंगळीगत डसल्यासारखे शब्दप्रयोग जनमानसात वापरले जाणारे शब्द शब्दकोशात हवेत. ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या धर्तीवर मराठी शब्दकोशांच्या नवनव्या आवृत्त्या निघाल्या पाहिजेत. काल, परिस्थिती, व्यक्ती तसेच प्रसंगानुसार बदलणारी भाषा हवी, त्या त्या परिसरातील ममत्व, गंध, काव्य लेखनात आले पाहिजे. परिसर अनुभवला तरच लिखाणात गंमत येते, जिवंतपणा येतो.

बीज पडले की ते रूजते. मोठा आशय असणारी नाटके, कादंबरी यांचे बीज अंकुरावे लागते. कलाकार, प्रसंग, कथेची गुंफण करावी लागते. व्यक्तिरेखेची वाढ अनेक दिवसांनी होते. प्रत्येक घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांचा मागचा-पुढचा संदर्भ तपासावा लागतो. त्यासाठी कच्चे मसुदे तयार करावे लागतात. हे कच्चे मसुदे, कच्चे टिपणच खऱ्या अर्थाने रसिकाच्या मनापर्यंत जाऊन पोहचते. पण आज दिवाळी अंकांमुळे मोठा आशय-विषय छोट्या कालावधीत सांगितला जातो. एखादा विषय, घटना मनात घोळत राहिली पाहिजे. बीज रूजले पाहिजे.

माझे लेखन वाचकांनी आपलेसे केले, त्याचे कारण माझे साहित्य देशी आहे, सच्चे आहे. इथल्या मातीशी त्याचा संबंध आहे. शेक्सपीअर, आचार्य अत्रे, सानेगुरुजी, कुसुमाग्रज यांच्या भाषेचे संस्कार माझ्या लेखनावर झाले आहेत.'

आई आहे शेतात (लेखक - र.वा.दिघे), व्यंकटेश माडगूळकर यांची माणदेशी माणसं, आनंद यादव, शंकर सारडा, चंद्रकांत बांडिवडेकर या लेखकांचे जाहीर ऋण यावेळी विश्वास पाटील यांना मान्य केले.



## 'विद्रोही' मुळे जनसाहित्याला प्रारंभ

विद्रोही साहित्यामुळे जनसाहित्याला प्रारंभ झाला. मुस्लिम जनसाहित्य, आदिवासी व ख्रिश्चन साहित्याची सुरुवात झाली असे विचार तिसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कवी यशवंत मनोहर यांनी कोल्हापूर येथे मांडले. विद्रोही सांस्कृतिक मंडळाच्या वतीने झालेल्या सत्काराच्या अध्यक्षस्थानी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी होते.

ते म्हणाले, विद्रोही हा काही आजकालचा नाही. तो सिंधुसंस्कृतीपासून चालत आला आहे. त्या काळापासून चार्वाक, गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर हे महानायक झाले आहेत. अलीकडचे काही लेखक आपल्या लेखनाच्या प्रसिद्धीसाठी प्रस्थापितांच्या प्रकाशक संस्थांची मनधरणी करतात हे गैर आहे

## भाषिक क्रम बदलल्याने मराठी साहित्यिक कोपऱ्यात ढकलला गेला!

वेगवेगळ्या प्रकारची साहित्य संमेलने भरणे हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. परंतु समाजात भाषिक क्रम बदलला गेल्याने मराठी साहित्यिक एका कोपऱ्यात ढकलला गेला आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार ह.मो.मराठे यांनी केले. 'साहित्य जल्लोष' कार्यक्रमाचे उद्घाटक होते.

वसईतील साहित्यिक, लेखक व पत्रकार यांच्या उपस्थितीत लेझीम, ढोल व ताशे यांच्या गजरात ग्रंथदिंडी निघाली. या ग्रंथदिंडीत विविध राजकीय नेते, लेखक, कवी, विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. वसईच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक वेशभूषा विद्यार्थ्यांनी केल्या होत्या. प्रमुख पाहुणे सुधीर जोगळेकर यांनी गुलामगिरीतून मुक्त होऊन ५३ वर्षे उलटून गेली तरी इंग्रजी मानसिकता गेली नाही. इंग्रजीचा अभ्यास करण्यास हरकत नाही. परंतु त्याचे ओंगळ प्रदर्शन होत असेल तर विचार करण्याची आज गरज आहे. साहित्य संस्था, धर्म, जातीयता व राजकारण यात मराठी भाषा विभागली जात आहे. साहित्य व इतर क्षेत्रातील गट तर मत्सर, द्वेष थांबवून प्रादेशिक भाषांच्या विकासाचे व त्यांना लोकमान्यता मिळवून देण्याचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. या प्रसंगी नगराध्यक्ष राजेश्वरी नारायण, स्तंभलेखक यशंवत जोशी, मुकेश सावे यांची भाषणे झाली. कारगिल युद्धाचे वृत्तपत्रीय कात्रणाचे प्रदर्शन दलितमित्र राजा जाधव यांनी भरवले. प्रदर्शनाचे उद्घाटन ह.मो.मराठे यांच्या हस्ते झाले. दुसऱ्या सत्रात 'आम्ही नाटक का लिहितो' या परिसंवादात शआफत खान,जयंत पवार,अशोक पाटोळे, एडवर्ड डिक्रूझ व रमाकांत वाघचौडे यानी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमास पु. द. कोडोलीकर,उपनगराध्यक्ष संदेश जाधव, अनंत कदम,प्रा.रमेश कुबल,पु. ग.वनमाळी, प्रा. द. वि. मणेरीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## तिसरे विद्रोही साहित्य संमेलन औरंगाबादमध्ये

विद्रोही सांस्कृतिक चळवळीतर्फे तिसरे विद्रोही संमेलन २० व २१ जानेवारी रोजी औरंगाबाद येथे ज्येष्ठ आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रसिद्ध पुरोगामी विचारवंत डॉ. एजाज अहमद उद्घाटक होते.

'जागतिकीकरणाच्या युगातील सांस्कृतिक दळण : कोण जात्यात, कोण सुपात?', राज्यघटनेचा फेरआढावा– धर्मनिरपेक्ष कष्टकरी, बहुजनांशी गद्दारी', विद्रोही साहित्य संस्कृती हाच मुख्य प्रवाह' व 'स्त्री पुरुष समतेचा लढा-इतिहास, भ्रम आणि वास्तव' अशा विषयांवरील परिसंवाद झाले. संमेलनात अध्यक्षांच्या हस्ते प्रसिद्ध शाहिरांचा सत्कार करण्यात आला. माजी संमेलनाध्यक्ष बाबुराव बागुल, साहित्यिक डॉ. आ. ह. साळुंखे हे संमेलनास उपस्थित होते.

## पुस्तकांची जागा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांनी घेतली.

सध्याच्या युगात लहान मुलांमधील पुस्तकांची आवड ही कमी होत असून, त्याची जागा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांनी घेतली आहे, असे मत प्रसिद्ध साहित्यिक अरविंदकुमार यांनी व्यक्त केले.नॅशनल बुक ट्रस्टतर्फे क्रॉस मैदान येथे 'राष्ट्रीय पुस्तक मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने आयोजित 'प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातील बालसाहित्य' या विषयावर चर्चासत्रात अरविंदकुमार, अनंत भावे, धीरूभाई पटेल, आदी मान्यवर उपस्थित होते.

अरविंदकुमार म्हणाले, 'सध्या बऱ्याच कथाकादंबऱ्यांवरून दूरदर्शन मालिका बनविण्यात येतात तर काही मालिकांवरून कथा-कादंबऱ्या लिहिण्याची ओढ लेखक व दिग्दर्शकांमध्ये दिसून येते. आज आपल्या देशात खास लहान मुलांच्या पुस्तकांची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे.मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रंथ आहेत पण त्यातील लहान मुलांसाठीची पुस्तके फारच थोडी आहेत,' असे सांगताना अनंत भावे म्हणाले, लहान मुलांसाठी पुस्तके लिहिण्यासाठी बरेच लेखक, प्रकाशक व विक्रेते इच्छुक नसतात ही खेदाची गोष्ट आहे. टी.व्ही.च्या माध्यमातून गाणी, चित्रपट, सिरीअल अशा प्रकारचे कार्यक्रम सादर केले जातात, परंतु लहान मुलांसाठी या प्रभावी माध्यमातून कुठलेही चांगले कार्यक्रम दाखविण्यात येत नाहीत.'

## लेखिकांनी दर्जेदार नाटकांचे लिखाण करावे– सुहास जोशी

दर्जेदार नाटके येत नसल्याने प्रेक्षक नाटकांपासून दूर जात आहेत, ही परिस्थिती बदलण्यासाठी लेखिकांनी उत्कृष्ट नाटकांचे लिखाण करावे, असे आवाहन सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि नाट्य कलावंत सुहास जोशी यांनी नागपूर येथे केले.

नावीन्य कला अकादमीच्या सहकार्याने आयोजित विदर्भ साहित्य संघाच्या पाचव्या लेखिका संमेलनात सुहास जोशी बोलत होत्या. संमेलनाध्यक्षा डॉ. प्रतिमा इंगोले, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार, मनोहर म्हैसाळकर, श्रीपाद जोशी नावीन्य कला अकादमीचे अशोक देव, माधुरी आशिरगडे, सुचित्रा कातरकर, अनुराधा मुंडले उपस्थित होत्या. सुहास जोशी यांनी ऱ्हास होत चाललेली वाचन संस्कृती आणि संगणकाच्या वाढत्या वेडाबद्दल चिंता व्यक्त केली. त्या म्हणाल्या, १५ ते २० वर्षे वयोगटातील मुले आज संगणकापुढे बसली आहेत. साहित्याबद्दल त्यांच्या मनात अजिबात प्रेम राहिलेले नाही.

एखादी कादंबरी किंवा कविता मनाला भावते तसे मन किंवा भावना संगणकाला



नसतात. पुढली पिढी दगड होणार की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

स्त्रीमुक्तीच्या आजच्या परिभाषेला विरोध दर्शविताना त्या म्हणाल्या, आम्हाला जी मुक्ती हवी आहे ती मिळत आहे. आमची मुक्ती दिसावी यासाठी संमेलनाची गरज नाही. घराघरांतून ती दिसली पाहिजे. स्त्री मुक्ती आणि अंधश्रद्धेला आपला विरोध नाही परंतु वाट वाकडी चालली आहे असे आपणास वाटते. स्त्रीमुक्तीवाद्यांनी शहरात सुखाने संसार करणाऱ्या महिलांमध्ये नाही तर खेड्यात आणि झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन स्त्री मुक्ती आंदोलन करावे असे आवाहन सुहास जोशी यांनी केले. प्रत्येक स्त्रीने आपण कोण आणि आपले समाजातील स्थान काय हे जाणून घेतले तरी ती आपोआप मुक्त होईल. येणाऱ्या शतकात स्त्रीमुक्ती हा शब्द केराच्या टोपलीत टाकण्यात यावा. आपण पुरुषाच्या बरोबरीने असून याचा वेगळा उल्लेख करण्याची गरज नाही.

प्रतिमा इंगोले यांनी समारोपीय भाषणात वाचनसंस्कृती टिकविण्यासाठी भगिनींनी सक्रिय कार्य आणि पुस्तकांना जीवदान देण्याची गरज व्यक्त केली. आम्ही लिहितो पण वाचकांचा प्रतिसाद मर्यादित स्वरूपात मिळतो. प्रकाशक मिळत नाही. पुस्तक प्रकाशनाच्या मार्गात अनेक अडथळे असून विदर्भ साहित्य संघाने याबाबत काही तरी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी महापौर कुंदा विजयकर, मीनाक्षी सरवटे, शकुंतला खोत, शुभांगी भडभडे, प्रतिमा इंगळे, नंदा आणि गीता जोग यांचा सुहास जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नावीन्य कला अकादमीतर्फे साहित्य संमेलनानिमित्त नवोदित कवयित्रींसाठी काव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

प्रथम पुरस्कार डॉ. वर्षा झाडे, माधुरी वरुडकर, द्वितीय नीना वंजारी व जयश्री दाणी-राऊत यांना तर तृतीय पुरस्कार शांता गणोरकर आणि कौमुदी पाटील यांना प्रदान करण्यात आला. या स्पर्धेसाठी डॉ. सुलभा हेर्लेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## वृत्तपत्रामध्ये जनजागृती आणि मतपरिवर्तनाची ताकद

लोकशाहीच्या चार प्रमुख स्तंभांपैकी वृत्तपत्र एक असून, या स्तंभाच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याची व मतपरिवर्तन करण्याची ताकद असते, असे उद्‌गार 'दैनिक सागर'चे संपादक व ज्येष्ठ पत्रकार निशाकांत जोशी यांनी मुंबई येथे काढले.

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कार देण्यात आले. यावेळी वयाची साठी पूर्ण झालेल्या ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कारही करण्यात आला. मुंबईला हॉलीवूडचा नव्हे, तर बॉलीवूडचा दर्जा प्राप्त झाल्याचे सांगताना जोशी म्हणाले, ''सध्या पत्रकारितेच्या क्षेत्रात बोगस पत्रकारांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे मुंबईच्या पत्रकारांच्या लेखणीची धार, पावित्र्य व हिंमत दिवसेंदिवस कमी होत आहे. ज्या व्यक्तींना पत्रकारितेचा गंध नाही, त्या व्यक्तींना सहजतेने पत्रकाराचे कार्ड उपलब्ध होत असल्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भेसळीचे प्रमाण वाढले आहे. बाळशास्त्री

जांभेकर व लोकमान्य टिळक यांचे नाव जेव्हा पत्रकारितेच्या क्षेत्रात घेतले जाते तेव्हा उदयोन्मुख तरुण पत्रकारांनी त्यांच्या विचारांचा व आचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मुंबईत परप्रांतीयांचे वाढते वर्चस्व लक्षात घेता आज मुंबईत मराठ्यांचे प्रमाण पूर्वी होते तेवढेच आहे. मुंबईत मराठीचे स्वरूप कायम ठेवण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आपल्या येथील सामान्य माणसांचा छापलेल्या शब्दांवर विश्वास असतो, असे सांगताना ते म्हणाले, 'समाजाच्या उन्नतीसाठी पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या धारेने, समाजप्रबोधनाचे काम करण्यासाठी आपले विचार परखडपणे मांडले पाहिजेत. पत्रकारांनी आपल्या पेशाशी कधीही तडजोड करू नये.'

सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केल्याबद्दल देण्यात आला.समतानंद अनंत हरि गद्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार दिनू रणदिवे यांना तर, संदीप आचार्य (आप्पा पेंडसे पुरस्कार), नरेंद्र पाठक (रमेश रायकर बोस पुरस्कार), संजय राऊत (गो.भा. गुजर स्मृती पुरस्कार), मधु कांबळे (कॉ. तु.कृ. सरमळकर स्मृती पुरस्कार), विनायक गोखले (तोलाराम कुकरेजा वृत्तछायाचित्रकार पुरस्कार), मधुकर भावे (भ्रमंती पुरस्कार), यशवंत रांजणकर (जयहिंद पुरस्कार), जयश्री देसाई यांना ( कु. मनीषा मधुकर भावे) देण्यात आले. षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त ज्येष्ठ पत्रकार एस. शंकरराव, सूर्यकांत फातरफेकर, चिनप्पा रंगनाथ भिसे, यशवंत पाध्ये, लक्ष्मण तावडे, राधाकृष्ण नार्वेकर आदींचा सत्कार करण्यात आला.

## आदिवासी संस्कृती जोपासण्यासाठी बोलीभाषा शब्दकोशांची निर्मिती

अतिशय मागासलेल्या गोंडी (कोयाग), कोलामी, भिलोरी, माडिया पावरी, मावची आणि कोरकू या भाषा विस्मृतीत जाऊ नये, यासाठी या बोलीभाषांचे शब्दकोश तयार करण्यात येत आहेत. त्यापैकी माडिया, कातकरी आणि कोलाम या भाषेचे इंग्रजी व मराठी शब्दकोश तयार करण्यात आले आहेत. लवकरच या शब्दकोशांचे प्रकाशन होईल अशी माहिती आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक आर.डी. खरोसेकर यांनी दिली.

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.२७ टक्के लोकसंख्या ही आदिवासींची आहे. या ७३.२८ लाख आदिवासी लोकांमध्ये ४७ अनुसूचित जमाती आहेत. भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कातकरी, ठाकर, कोकणा, कोरकू, कोलाम, आंध, परधान, हलबा, गावीत, धानका, मल्हार कोळी, ढोरकोळी आणि पारधी या जमाती प्रमुख होत.

या १७ वरील आदिवासी जमातींपैकी आंध, महादेव कोळी आणि मल्हार कोळी या आदिवासी जमातींना स्वतंत्र बोलीभाषा नाही. आंध जमातीचा उगम आंध्र प्रदेशातून असल्याने त्यांच्या बोलण्यात 'तेलगू' शब्दांचा भरणा अधिक आढळून येतो, परंतु महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याने ते मराठी बोलतात. महादेव कोळी हे मराठी भाषा बोलतात तर मल्हार कोळी हे वारली या बोलीभाषेशी मिळतीजुळती भाषा बोलतात. स्वतंत्र बोलीभाषा असलेल्या



जमातींना त्यांच्या भाषेचा विकास करणे किंवा लोकांपर्यंत पोहोचविणे अवघड गेले असते. त्यामुळे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने पुढाकार घेतला, शासनाने 'फेब्रुवारी १९९३ मध्ये आदिवासींच्या बोलीभाषावर शब्दकोश तयार करण्यास मान्यता दिली. आदिवासी बोलीभाषांचे शब्दोच्चार मराठी व रोमन लिपीत लिहून त्यांचे अर्थ अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेत लिहिले गेले आहेत. ७ आदिवासी बोली भाषांचे मराठी व इंग्रजी भाषेतील दोन स्वतंत्र शब्दकोश तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी गोंडी (कोयांग) या शब्दकोशात १०५९३ (मराठी) तर १०५९३ इंग्रजी शब्द आहेत. या पुस्तकाची पृष्ठसंख्या क्रमशः १६९ आणि १७७ आहे. कोलामी या शब्दकोशात ४८८५ शब्द, भिलोरी १० हजार, माडिया ४१००, याशिवाय पावरी, मावची आणि कोरकू या शब्दकोशात ५ हजार शब्दांचा समावेश आहे. धुळे जिल्ह्यातील नवापूर, साक्री व पिंपळनेर या तालुक्यात मावची बोलीभाषा बोलली जाते. मावची भाषा ही 'इंडो आर्यन' या भाषा समूहात गणली जाते. 'पावरी' ही भिल्ल भाषेची एक पोटभाषा आहे. राज्यात ही धुळे जिल्ह्यात तोरणमाळ, अक्राणी व अक्कलकुवाचा काही भाग व धडगाव या भागातील आदिवासींची मातृभाषा व बोलीभाषा आहे. ही भाषा 'इंडो आर्यन' भाषा समूहातील एक असून या भाषेवर हिंदी, गुजराथी व मराठी भाषांचा प्रभाव आहे. या भाषेला स्वतंत्र लिपी नाही. भिलोरी ही बोलीभाषा महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील अक्राणी, धडगाव व साक्री तालुक्यात बोलली जाते. गोंडी (कोयाग) ही भाषा महाराष्ट्रातील अहेरी, सिरोंचा, धानोरा, कुरखेडा, केळापूर, वणी, यवतमाळ या भागात बोलली जाते. द्रविड भाषा समूहातील ही भाषा असून हिंदी, मराठी व तेलगू या भाषेचा प्रभाव आहे.

कोरकू ही बोलीभाषा फक्त अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट तालुक्यात बोलली जाते. परंतु या जमातीची फार मोठी संख्या मध्य प्रदेशात आहे. कोलाम ही भाषा चंद्रपूर जिल्ह्याच्या राजूर, किनवट, पांढरकवडा, यवतमाळ, वणी या तालुक्यात बोलली जाते. या सर्व भाषांच्या शब्दकोशांमुळे अन्य भाषिकांना आदिवासींची भाषा अवगत करणे सहज शक्य होणार आहे.

## नव्या प्रतिभेचा शोध हे भैरूरतन दमाणी पुरस्काराचे वैशिष्ट्य : बोराडे

आजपर्यंत इतिहासकालीन आदरयुक्त व्यक्तींवर लेखन झालेले आहे. 'बेगम समरू' या ऐतिहासिक कादंबरीमुळे दुर्लक्षित व्यक्ती प्रकाशात आल्याने एक नवा प्रवाह अस्तित्वात येत आहे. 'आंधळ्याच्या गायी' च्या सामर्थ्यवान लेखिकेची निवड सार्थ करणारी आहे. तर 'दगडफोड्या' या आत्मचरित्राच्या रूपाने रामचंद्र नलावडे या नव्या लेखकाचा शोध लागला. यामुळे भैरूरतन दमाणी पुरस्कार वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे,असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी केले.

सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार प्रदान समारंभ झाला. अध्यक्षस्थानी डॉ. द.ता. भोसले हे होते. खासदार सुशीलकुमार शिंदे, महापौर संजय हेमगड्डी संस्थापक प्रेमरतन दमाणी व नवरतन दमाणी यांची उपस्थिती होती.

'बेगम समरू' या ऐतिहासिक कादंबरीबद्दल प्रा. रंगनाथ तिवारी 'आंधळ्याच्या गायी' कथासंग्रहाबद्दल सौ. मेघना पेठे व 'दगडफोड्या' या आत्मचरित्राबद्दल रामचंद्र नलावडे यांना

प्राचार्य रा.रं. बोराडे यांच्या हस्ते दमाणी साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. १५ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह या स्वरूपात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. बोराडे म्हणाले की खरेखुरे साहित्य जीवनाविषयी अंतर्मूख करायला लावते. मनात आलेले विचार उन्नयन करायला लावते. अशा साहित्याविषयी समाजास आपुलकी वाटते.

समाजास दिशा देणारे लेखन लेखकांकडून होते. या लेखनामुळे राष्ट्र निर्मितीसाठी हातभार लागत आहे,असे प्रतिपादन भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्काराचे अध्यक्ष खासदार सुशीलकुमार शिंदे यांनी केले. पूर्वीच्या काळी दलित साहित्याची गणना विद्रोही साहित्यात होत होती. परंतु आता हे साहित्य चिंतनशील साहित्य असल्याचे मानले जात आहे. या साहित्यामुळे समाजास नवी प्रेरणा मिळत आहे. दिवसेंदिवस दलित साहित्य तेजस्वी होत आहे. या साहित्यामुळे एक नवी परंपरा निर्माण होत आहे. पुराण साहित्याला दलित साहित्याची झालर लागत आहे, असा त्यांनी गौरव केला. अक्षरे माहित नसलेल्या समाजाकडून साहित्य निर्मिती होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. आपल्या भाषणात त्यांनी वीर सावरकरांच्या सामाजिक समरसतेच्या भूमिकेचा विसर सध्या पडत असल्याबद्दल खंत व्यक्त केली. दमाणी साहित्य पुरस्काराबद्दल लेखकांचे अभिनंदन करून दमाणी परिवाराने पुरस्काराच्या रकमेत वाढ करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रेमरतन दमाणी यांनी प्रास्ताविक केले तर आमदार रामदार फुटाणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'दैनिक तरुण भारत' चे संपादक विवेक घळसासी यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीत केले.

दुग्धविकास मंत्री आनंदराव देवकते, जिल्हाधिकारी दीपक कपूर, पोलीस आयुक्त खंडेराव शिंदे, प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले, शंकर सारडा, प्रा. श्रीराम पुजारी, प्रा. निशिकांत ठकार, पुरस्कार निवड समितीचे सदस्य वसंतराव एकबोटे, लक्ष्मीनारायण बोल्ली, चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, दत्ता हलसगीकर, कार्यवाह अरविंद कुलकर्णी, इ.साहित्यिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## सभोवतालचा उद्रेक समजून घेण्याची वेळ

घरातल्या घरात छोट्या पडद्यावर महाकाव्यातील लढाया पाहणाऱ्या आपल्यासारख्यांना आता आपल्या सभोवताली निर्माण होणारे उद्रेक समजून घेण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्रा. केशव मेश्राम यांनी मुंबई येथे केले.

मुंबई मराठी साहित्य संघ आणि गोमंतक सेवा संघ आयोजित मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून प्रा.मेश्राम बोलत होते.

समाजात अजूनही वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आहे. तिची प्रकट सूक्ष्म रूपे अनेक व्यवहारात आढळतात, असेही प्रा. मेश्राम यांनी नमूद केले. धर्म, अर्थ, शिक्षण, राजकारण, समाजकारण यांच्या संमिश्र संस्कारातून साकारणाऱ्या संस्कृतीचा गाभा जाणून घेण्याविषयीची मानसिकता घडविणे अत्यंत गरजेचे आहे. असे घडले तरच शब्द हे अर्थ प्रदान करण्याचे कार्य करू शकतील. वारा बनून ते वाऱ्यावर जाणार नाहीत.'अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण



घेऊन बेकार, उद्वेग अनुभवणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. कशावरच विश्वास बसू नये, अशी अश्रद्धा मानवी मनाला आवळते आहे. त्यापोटीच सांस्कृतिक आयुष्यातील एकसंधता विखंडित झाली आणि माणूस सुखाचे तुकडे वेचण्यात समाधान शोधू लागला.' असे ते म्हणाले.

साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे यांनी मराठी वाचकांविषयी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, 'इतर माध्यमातून श्रोत्यांना, वाचकांना साहित्यापेक्षा जास्त काही तरी मिळत आहे. ग्रामीण व जिल्हा स्तरावर मात्र अशा प्रकारच्या संमेलनाला प्रतिसाद मिळत आहे.त्यांनी बालवाचक नष्ट होत चालल्याची खंत व्यक्त केली. आपल्या पाल्यांनी अधिक वेळ हा वाचनात घालवावा, असे पालकांनाच वाटत नसल्यामुळे तसे झाले आहे, भावी मराठी साहित्याचे चित्र कसे असेल, अशी भीती त्यांना वाटते.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. नितू मांडके यांनी संमेलनाला मिळालेल्या रसिकांच्या अल्पप्रतिसादाचा उल्लेख केला. मराठी लोकांची अधिक संख्या असणाऱ्या पार्ल्यात असे घडते, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी मंगेश पाडगांवकर, निरंजन उजगरे, शंकर वैद्य, साहित्य संघाचे कार्याध्यक्ष डॉ. दाजी भाटवडेकर, अभिनेते मोहनदास सुखटणकर, गोमंतक सेवा संघाचे श्रीकांत लवंगे, डॉ. श्रीरंग आडारकर आदी उपस्थित होते.

## 'पु.लं.' नी मध्यमवर्गीय जाणिवा गोंजारण्याचेच काम केले

'पु.लं.'नी मध्यमवर्गीय जाणीवा गोंजारण्याचेच काम केले, असे मत विद्रोही साहित्य संमेलनामध्ये झालेल्या परिसंवादात सहभागी झालेल्या वक्त्यांनी व्यक्त केले.

इचलकरंजीच्या घोरपडे नाट्यगृहात झालेल्या परिसंवादाचा विषय 'पु.ल.गेले... अण्णाभाऊ आणि शाहीर अमर शेखही एकेकाळी गेले होते' असा होता. धनाजी गुरव, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष किशोर जाधव, अविनाश कदम (मुंबई), डॉ. अच्युत माने, पार्थ पोळके यांनी परिसंवादात भाग घेतला. अध्यक्षस्थानी डॉ. बाबूराव गुरव होते.

धनाजी गुरव म्हणाले की, शालेय जीवनापासून आम्हाला पु.ल.वाचा असे सांगण्यात आले. मात्र दलितांचे आणि श्रमिकांचे चित्रण करणाऱ्या शाहीर अण्णाभाऊंचे लेखन वाचण्याची प्रेरणा कुणी दिली नाही. किंबहुना आमची तशी मानसिकताच ठेवण्यात आली. मार्मिक लेखन करणारे पु.ल. वैचारिक लेखन करताना आद्य शंकराचार्यांनी परिवर्तनवादी गती वाढविली, असे सांगतात. मग त्यांना परिवर्तनवादी म्हणायचं का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, अण्णाभाऊंच्या साहित्यामधील अंगार अथवा संघर्षाची प्रेरणा त्यांच्या लेखनामध्ये दिसत नाही.

अण्णाभाऊ साठे हे बहुजन समाजाच्या आधुनिक वाङ्मयाचे उद्गाते असल्याचे सांगून डॉ.अच्युत माने म्हणाले की, लेखन आणि व्यवहारामध्ये मेळ घालणाऱ्या प्रतिमा त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. तथाकथित साहित्यिकांसारख्या राष्ट्रावादाच्या केवळ गप्पा त्यांनी मारल्या नाहीत, तर शाहीर अमर शेख यांच्या साथीने 'बर्फ पेटला आहे, विझवायला चला',

असे आवाहन त्यांनी केले. चाळीस कादंबऱ्या लिहिणाऱ्या या माणसाचे मोठेपण इथल्या परंपरावादी आणि ब्राह्मणी माध्यमांना दिसले नाही. समीक्षकांनीही त्यांची नोंद घेतली नाही. तो त्यांच्या पारंपरिक वृत्तीचाच भाग आहे. पु.ल. गेल्यानंतर जे चित्र माध्यामांनी उभे केले. त्यातून ही मानसिकता स्पष्ट होते. अण्णाभाऊंचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. ते पुन्हा एकदा सांगण्याची जबाबदारी विद्रोही चळवळीवर आहे.

ब्राह्मणी माध्यामांनी दलित, आदिवासी आणि ग्रामीण साहित्याची चर्चा १९८५ पासूनच बंद केल्याचे नमूद करून पार्थ पोळके म्हणाले की, आमचे साहित्य दर्जेदार आणि नवनिर्माण करणारे आहे. आमच्या साहित्याची प्रेरणा आमचं जगणं आहे. आमच्या वेदना आहेत. त्यामधून निर्माण होणारे साहित्य निर्मितीक्षमच आहे. त्याला मध्यमवर्गीय कसोट्या लावण्याची गरज नाही.पु.लं.नी कुणाला तरी हसविण्यासाठी आणि गुदगुल्या करण्यासाठी लिहिलं. या साहित्याने देश उभा राहतो का? वेश्येला भोगल्यासारखं अनेकांनी या देशाला भोगलं. अशा परकियांविरुद्ध लढण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती देणारं ते साहित्य आहे का? महाराष्ट्र सारस्वतामधील अशा 'खोगीरभरती' पेक्षा 'फकिरा' सारखा दमदार माणूस, ठासून भरलेला माणूस चित्रित करणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, बहुजन समाजाची अस्मिता जागृत करणारे आणि बंड करून संघर्षाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य देणारे आहे. ब्राह्मणी व्यवस्थेने या देशावर कधीच प्रेम केले नाही. या व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या, तिचे समर्थन करणाऱ्या साहित्यिकांकडून काय अपेक्षा करायच्या? या छावणीविरुद्ध आपली दुसरी छावणी आता उभारावीच लागणार आहे.

'पु.लं.' च्या साहित्यावर मध्यमवर्गीयांचा प्रचंड प्रभाव असल्याचे सांगून अविनाश कदम म्हणाले की, त्यांचे साहित्य कर्मठ आणि सनातनी, कातडी बचावू आणि कणाहीन आहे. शेरेबाजीच्या स्वरूपातील लेखन करताना मध्यमवर्गीयांच्या परंपरांना त्यांनी धक्का लावला नाही. समाजकारण आणि अर्थकारण बदलत असताना मध्यमवर्गीयांमध्ये निर्माण होणारा अंतर्विरोध त्यांनी मांडलेला दिसत नाही. बदलाची प्रेरणा तर त्यांच्या साहित्यातून दिसतच नाही.

पु.लं नी आणलेला चष्मा मध्यमवर्गापलीकडे कधी गेलाच नाही. वैचारिक भूमिका घेणाऱ्या पु.लं.नी तसा प्रयत्नही केला नाही, असा आरोप करून डॉ. बाबूराव गुरव म्हणाले की, 'पु.लं.'च्या साहित्याला मर्यादा आहेत. आणि म्हणूनच त्यांच्या आणि शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यात तुलनाच होऊ शकत नाही. भारतात ३२ कोटी लोक एकवेळा जेवतात, सहा कोटी लोक उपाशी राहतात तर आठ लाख मुलं आजही शाळेत जात नाहीत. अशा परिस्थितीत विद्रोहाची गरज नाही काय? पु.ल.आणि कुसुमाग्रज हे पुरोगामी होते, पण त्यांना मर्यादा होत्या. बंगल्याच्या खिडकीतून बघत बदामाचा शिरा खात खात केलेले अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नव्हते, बासुंदीचा घोट घेत केलेले लेखन नव्हते तर क्रांतीचा इतिहास घडवणारे होते. ते ध्येयवादी लेखक होते पण मनोरंजन करणारे लेखक नव्हते. जागतिक स्पर्धेत उतरणारे महान व्यक्तिमत्त्व होते आणि म्हणूनच आज विद्रोही चळवळ उभी राहिली आहे. जीवनाला तोंड द्यायचं कसं, हे अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख यांच्या साहित्यानंच शिकवलं.



## परिवर्तनवादी शक्तींनी जागतिक पातळीवर एकत्र येण्याची गरज

एकाच वेळी आम्ही आंबेडकरवादी, मार्क्सवादी, डाव्या व पुरोगामी, परिवर्तनवादी, चळवळीचे सभासद आहोत. आम्हाला कुणी कितीही शिव्या दिल्या तरी आता या शक्तींशी हातमिळवणी करायला पाहिजे, नव्हे तर सर्व परिवर्तनवादी शक्तींनी आता जागतिक पातळीवर एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन तिसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांनी केले.

दिल्लीचे प्रसिद्ध विचारवंत कॉ. एजाज अहमद यांनी या संमेलनाचे उद्घाटन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याच नावाचे व विचारांचे एकविसावे शतक राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. लक्ष्मण माने, नागनाथअण्णा नाईकवाडी आणि भारत पाटणकर यांच्यासारखे अनेक प्रमुखे कार्यकर्ते सध्या बौद्ध धम्म स्वीकारण्याचा विचार करीत असल्याचे जाहीर केले.

आम्ही आमच्या महानायकांचे ऐकू, खलनायकांचे ऐकणार नाही, असा निर्धार या विद्रोही साहित्य संमेलनाच्या निमित्ताने करायला हवा. मोडलेली, कोसळलेली संस्कृती उभी करण्यासाठी महानायकाच्या स्वप्नातील समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध होण्याची वेळ आता आलेली आहे, विद्रोह ही कल्पना मराठी साहित्यात आंबेडकरी साहित्याने आणली, असे ते म्हणाले. कार्याध्यक्ष कॉ. भीमराव बनसोड यांनी प्रास्ताविक केले. निमंत्रक प्रा. अविनाश डोळस यांनी विद्रोही साहित्य संमेलनाची भूमिका विशद केली. स्वागताध्यक्ष महावीर जोंधळे यांनी त्यांचा सत्कार केला.

## नाशिकमध्ये मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

सहावे अखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन नाशिक येथे झाले.

प्रसिद्ध लेखक आणि कवी खलील मोमीन संमेलनाचे अध्यक्ष होते. प्रसिद्ध शायर हसन कमाल यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

राज्याचे कामगारमंत्री हुसेन दलवाई, बाबूराव बागूल, प्रा.डॉ. रावसाहेब कसबे, शाहीर वामन कर्डक, जवाहरलाल नेहरून विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. इम्तियाज अहमद या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संमेलनाच्या समारोपप्रसंगी नवाब मलिक, अनिस अहमद, मोहंमद आरिफ खान हे उपस्थित होते. या संमेलनात चार परिसंवाद, मराठी, हिंदी, उर्दू संयुक्त कवी संमेलन, साहित्यिकांच्या मुलाखती आदी कार्यक्रम झाले.

## 'अनुभवामृत बोधेश्वरी'चे २६ ला प्रकाशन

पुणे येथील ॐ प्रकाशन द्वारा 'अनुभवामृत बोधेश्वरी : खंड १– प्रियुचि प्राणेश्वरी' या ग्रंथाचे प्रकाशन २६ जानेवारी रोजी सायं. ५.३० वाजता उद्यान प्रसाद कार्यालयात झाले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ शुक्ल व स्वामी राधिकानंद सरस्वती तसेच डॉ. कल्याण गंगवाल हे उपस्थित होते. स्वामी उमानंद सरस्वती यांच्या अनुभवामृत या ग्रंथावरील प्रवचनांचे हे संकलन आहे.

## 'मनोमयी'मध्ये मानवी संबंधांचे यथार्थ चित्रण

'मनोमयी' हे नाटक जयवंत दळवी आणि चिं. त्र्यं. खानोलकर या नाटककारांनी हाताळलेल्या विषयांच्या आसपास जाते. या नाटकात मानवी संबंधांचे यथार्थ चित्रण दिसते,'' असे उद्गार डॉ. वि. भा. देशपांडे यांनी मेधा तेलंग यांच्या नाटकाचे प्रकाशन करताना काढले.

''चांगले नाटक माणसांच्या संबंधातलेच असते. या नाटकातील संवादात सहजता, आपलेपणा, वास्तवता आहे. ही पात्रे आपल्याला कुठेतरी भेटणारी आहेत.''

डॉ. सचिन देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून म्हणाले, सर्वसामान्य माणसांच्या मानसिक प्रश्नांचे हे नाटक आहे.

लेखिका तेलंग म्हणाल्या, ''हा विषय मला मांडावासा वाटला. कारण नैराश्य हे आपण लहान वयापासून अनुभवत असतो आणि ते आपण सातत्याने अनुभवत गेलो तर एक नकारार्थी प्रवृत्ती आपल्या मनात निर्माण होते. मानसिक कोंडी होऊन एखाद्या व्यक्तिमत्त्वाचं जगणं असह्य होतं आणि अशा व्यक्तीला सांभाळणारं कोणीतरी असावं लागतं. तरच ती व्यक्ती काही प्रमाणात जगू शकते.''

## सरकाराची रीत नाही बरी गंऽ । बायका पोरं रडती रस्त्यावरी गंऽऽ

'धरणात हक्काची जमीन गेली, घोंगडी गेली, छप्परही गेले आणि संसार रस्त्यावर पडला; मिळाले मात्र काहीच नाही.' ही व्यथा घेऊन आलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील धरणग्रस्त महिलांनी आपल्या भावना ग्रामीण शैलीने गाऊन व्यक्त केल्या, तेव्हा विद्रोही साहित्य संमेलनातील रसिकांचे हृदय हेलावले. गाण्याला मिळालेल्या टाळ्यांच्या प्रतिसादातूनही विद्रोह आणि वेदनांचेच गीत उमटले.

संमेलनात साहित्यिकाची वेगवेगळ्या विषयांवरील शैलीदार भाषणे झाली. आक्रमक इशारे, आव्हाने दिली गेली; मात्र सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले ते वारणा खोऱ्यातील धरणामुळे सोनारली, धनगरवाडी (ता. शहूवाडी, जि. कोल्हापूर) येथून विस्थापित झालेल्या महिलांनी. सध्या हे लोक हातकणंगले तालुक्यातील भेंडवडे येथे राहत आहेत. रोजगाराचे साधन हिरावले गेल्याने लक्ष्मीबाई बोडके, कोंडाबाई पाटने, धोंडाबाई बोडके, जनाबाई झोरे, धोंडाबाई विठ्ठल बोडके यांनी त्यांची दुरवस्था गीत गाऊन व्यक्त केली.

*सरकारानं केलं, आमच्या संसाराचं वाटुळं गं*
*बायका पोरं रडती रस्त्यावरी गं*
*सरकाराची टीम नाही बरी गं*
*बायका-पोरं रडती रस्त्यावरी गं..*

या त्यांच्या शब्दाशब्दांतून दु:खं, वेदना आणि कारुण्याचे सूर घुमत राहिले.

ऐकून रसिकांचेही हृदये हेलावले. डोळ्यांच्या कडा ओल्या झालेल्या स्थितीत त्यांनीही गाण्यापाठोपाठ टाळ्यांचा ठेका धरला आणि त्यातूनही वेदनेचेच ध्वनी उमटले.



## 'मराठीतील स्त्रियांचे साहित्य' चर्चासत्र

साहित्य अकादमी आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ तौलनिक भाषा व साहित्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ जानेवारी रोजी विद्यापीठात 'मराठीतील स्त्रियांचे साहित्य' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

या चर्चासत्राचे उद्घाटन रविवार दि. २१ रोजी म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते झाले. चंद्रशेखर जहागीरदार यांचे 'भारतीय संदर्भात स्त्रीवाद' या विषयावर भाषण झाले. कुलगुरू प्रा. डॉ. एस. एफ. पाटील अध्यक्ष होते.

पहिल्या सत्रात दुपारी भालचंद्र नेमाडे यांच्या अध्यक्षतेखालील सत्रात रा. ग. जाधव यांचे 'मराठीतील स्त्रीवादी काव्याचे मूल्यमापन' या विषयावर तर विलास खोले यांचे 'स्त्रियांचे कथा साहित्य' या विषयांवर निबंधवाचन झाले.

ज्येष्ठ समीक्षक गो. मा. पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'संत कवयित्री' या विषयावर श्रीमती सुषमा करोगल यांचे निबंध वाचन झाले. याशिवाय 'लोकसाहित्यातील स्त्री' या विषयावर प्रा. मधुकर वाकोडे, 'स्त्रियांचे आत्मचरित्रे' या विषयावर श्रीमती सुमती लांडे, 'खानदेशातील बहिणाबाईंची कविता' या विषयावर रमेश वरखेडे, 'आदिवासी साहित्य आणि स्त्री' या विषयावर डी. जी. पाटील, 'अहिराणी स्त्रीसाहित्य' या विषयावर सुधीर देवरे तर 'आजच्या कवयित्री' या विषयावर वसंत आबाजी डहाके यांनी निबंध वाचले.

तिसरे सत्र रा. ग. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. 'नवे जग आणि स्त्री' या विषयावर श्रीमती वृंदा भार्गवे यांनी निबंध वाचन केले.

'स्त्री आणि प्रसार माध्यमे' या विषयावर श्रीमती मेधा कुलकर्णी, '१९६० नंतरचे स्त्री साहित्य' या विषयावर श्रीमती सुजाता शिरवळकर तर इंदिरा संत,पद्मा गोळे,अनुराधा पोतदार, अनुराधा पाटील यांच्या कवितांविषयी श्रीमती प्रभा गणोरकर यांनी निबंध वाचन केले.

## 'ग्रामीण साहित्य हा प्रकार नव्या संदर्भासह येणारच'

जोपर्यंत शेती आहे, तोपर्यंत कालानुरूप संदर्भ बदलत गेले तरी शहरी आणि ग्रामीण हा भेद कायम राहणार आहे; त्यामुळे ग्रामीण साहित्य हा प्रकार नवनव्या संदर्भासह येतच राहणार, असे मत प्रसिद्ध कादंबरी लेखक नामदेव कांबळे यांनी व्यक्त केले.

देशमुख आणि कंपनीच्या वतीने सुलोचनाबाई देशमुख यांचा स्मृतिदिन कादंबरी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त लीना मेहेंदळे यांच्या 'नित्य-लीला' या कादंबरीचे प्रकाशन शांताबाई किर्लोस्कर यांच्या हस्ते, नामदेव कांबळे यांच्या 'सेलझाडा' या कादंबरीचे प्रकाशन स. ह. देशपांडे यांच्या हस्ते व भारत काळे यांच्या 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीचे प्रकाशन नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नामदेव कांबळे आणि भारत काळे यांच्याशी त्यांच्या कादंबरीबद्दल रेखा इनामदार, रमेश भागवत, सतीश पिंपळखेडकर, नरेश गवळी, कल्याणी दिवेकर, विद्यासागर महाजन आणि सुनंदा महाजन यांनी चर्चा केली.

''शहरी आणि ग्रामीण भेद करणाऱ्या सीमारेषा आधुनिक काळात पुसट होत असल्या तरी शेती व्यवसाय आहे तोपर्यंत ग्रामीण भागातील काही विशेष संदर्भ वेगळे राहणार आहेत, त्यामुळे ग्रामीण साहित्य हा प्रकार बदलत्या स्वरूपात का होईना जिवंत राहीलच,'' असे कांबळे यांनी चर्चेच्या वेळी सांगितले. ते 'सेलझाडा' या आपल्या कादंबरीबद्दल बोलताना म्हणाले, ''माझे बरेचसे आयुष्य ग्रामीण भागात गेले आहे. मामाच्या मुलीशीच लग्न झाल्यावर या भागाशी सतत संपर्क राहिला आणि बलुतेदारी नष्ट होत आहे ही जाणीव होत राहिली. ते साहित्यात मांडावेसे वाटल्याने ही कादंबरी लिहिली.''

'शांताबाई किर्लोस्कर यांनी सुलोचनाबाईंच्या आठवणी सांगितल्या. विनय हर्डीकर यांनी समारोप केला.

## देशमुख आणि कंपनीला खांडेकरांच्या पुस्तकांचे हक्क नाहीत

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. यांना कै. वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांच्या ययाति, अमृतवेल इत्यादी सर्व पुस्तकांचे कॉपीराईट नाहीत असा महत्त्वपूर्ण निकाल पुणे येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश श्री. एस्. आर्. खानझोडे यांनी ३ फेब्रुवारी रोजी दिला. कै. खांडेकरांच्या मृत्यूपूर्वी त्यांनी कै. रा. ज. देशमुखांशी १९७३ साली केलेल्या कराराप्रमाणे देशमुखांना त्यांनी आपली पुस्तके प्रकाशित करण्याची काही अटींवर परवानगी दिलेली होती. त्यातील साठ पुस्तकांबाबत या पूर्वीच कोल्हापूर येथील दाव्यातील निकालाप्रमाणे देशमुख आणि कंपनीला प्रकाशन हक्क राहिले नव्हते. तथापि ययाति, अमृतवेल, उल्का, पांढरे ढग इत्यादी महत्त्वाची बारा पुस्तके देशमुख आणि कंपनी प्रकाशित करत होती. या बारा पुस्तकांचे कॉपीराईटही देशमुख आणि कंपनी प्रा. लि. कडे नाहीत असे या निकालाने स्पष्ट झाले आहे.

सदरहू बारा पुस्तकांचे कॉपीराईट देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. यांच्याकडे असल्याचे कोर्टाने जाहीर करावे आणि कै. खांडेकरांच्या वारसांनी या पुस्तकांबाबत कोणत्याही प्रकारचे हक्क इतर कोणालाही देऊ नयेत असा निरंतरचा मनाई हुकूम कोर्टाने द्यावा अशी मागणी करणारा दावा देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. यांनी पुणे येथे दाखल केला होता.

देशमुख आणि कंपनीने या पुस्तकांवरील रॉयल्टीची होणारी रक्कम १९८० पासून कै. खांडेकरांच्या वारसांना दिलेली नाही आणि १९७३ च्या करारातील इतरही अटींचे पालन केलेले नाही व देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. ला या पुस्तकांबाबतही कोणतेही हक्क नाहीत असे कै. खांडेकरांच्या वारसांतर्फे परिणामकारकरित्या प्रतिपादन केले गेले.

मे. कोर्टाने कै. खांडेकरांच्या वारसांचे म्हणणे मान्य करून देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. यांना कै. खांडेकरांच्या पुस्तकांचे कॉपीराईट नाहीत असा निष्कर्ष काढून त्यांचा दावा खर्चसुद्धा फेटाळून लावला आहे.



## गोमंतकात 'कांचनगंगा' चे प्रकाशन संपन्न




डावीकडून- अशोक समेळ, आमदार सुदिन ढवळीकर,नियोजनमंत्री प्रकाश पडते,मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, माधवी देसाई, अध्यक्ष शरद कारखानीस आणि अनिल मेहता

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित 'कांचनगंगा' या पुस्तकाचे प्रकाशन गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या हस्ते महालक्ष्मी बांदिवडे येथे २० जानेवारी रोजी झाले. यावेळी व्यासपीठावर मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे श्री. अनिल मेहता, वनमंत्री प्रकाश पडते, आमदार सुदिन ढवळीकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष शरद कारखानीस, दिग्दर्शक, नाट्यलेखक अशोक समेळ उपस्थित होते.

'कांचनाचा त्याग करूनही ज्या गंगेसारख्या राहिल्या त्या कांचनगंगा' अशा गौरवपर उद्गारांनी सुरुवात करुन सुप्रसिद्ध दिग्दर्शक नाट्य अभिनेते, लेखक अशोक समेळ यांनी 'कांचनगंगा' या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या कादंबरीस उत्तुंग भवितव्य असल्याचे सांगितले. ते म्हणाले,'माधवीताईंनी कांचनगंगातून उभ्या केलेल्या उत्तुंग व्यक्तिमत्वांची भूरळ पडल्यामुळेच या कादंबरीवर दूरदर्शन मालिका बनत आहे. व लवकरच ती रसिकांपुढे येईल.'

श्री. अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले. कांचनगंगा सारख्या चरितकादंबऱ्यांचे वितरण शिक्षणसंस्थांमध्ये होऊन नव्या पिढीला त्यांची ओळख व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सुदिन ढवळीकर व प्रकाश पडते यांनी माधवीताईच्या साहित्यिक कार्याचा गौरव केला. पुस्तकाच्या प्रकाशनानंतर श्री. पर्रीकर आपल्या भाषणात म्हणाले की पुस्तक वाचनाने मिळणारे ज्ञान हे सर्वकाळ महत्त्वाचे ठरते.

आपले मनोगत व्यक्त करताना लेखिका माधवी देसाई म्हणाल्या,'गोमंतकीय सुकन्या अंजनी मालपेकर, हिराबाई पेडणेकर व सुरंगा मुळगावकर या तिघींचा गौरव करण्यासाठी हा प्रकाशन सोहळा आहे.'

या प्रकाशन सोहळयास विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.

# पुरस्कार

## पंकज कुरूलकर यांना राजेंद्र बनहट्टी पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे 'साकी,बार अँड रेस्टॉरंट' या कथासंग्रहासाठी पंकज कुरूलकर यांना 'राजेंद्र बनहट्टी कथा पारितोषिक' देण्यात आले. गौरवचिन्ह आणि पाच हजार रुपये, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. कुरूलकर संगणक अभियंता असल्याचा उल्लेख करून प्रा.रा. रं. बोराडे म्हणाले, 'साहित्य हा ठराविक लोकांचा प्रांत नाही. विविध क्षेत्रांतील लोकांनी त्यात लिहिल्यास साहित्य समृद्ध होईल. त्याचप्रमाणे समाजजीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब साहित्यात पडले पाहिजे ही अपेक्षासुद्धा पूर्ण होईल.'

लेखकांना पुरस्कार देतानाच वाचकांसाठीही एखादा पुरस्कार द्यावा, कारण वाचकांमुळेच लेखकांना लिहिण्याची प्रेरणा मिळते, त्याचाही विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली.

कुरूलकर म्हणाले, ''वास्तवातील अनुभवांनी अस्वस्थ झाल्यावर माझ्याकडून लिहिले जाते. त्यामुळेच वर्णनापेक्षा आशयाला मी अधिक महत्त्व देतो.''

निवड समितीतर्फे प्रा. चारुदत्त निमकर यांनी भाषण केले. श्री. कुरूलकर यांनी या वेळी पुणे मराठी ग्रंथालयाला साडेसात हजार रुपयांची देणगी दिली. ग्रंथालयाचे कार्यवाह मुकुंद अनगळ यांनी प्रास्ताविक केले.

## कवी गोवर्धन शर्मा 'घायल' यांना राष्ट्रीय सिंधी परिषद पुरस्कार

पुणे येथील सिंधी कवी गोवर्धन शर्मा 'घायल' यांना बडोद्याच्या 'राष्ट्रीय सिंधी भाषा विकास परिषदे'तर्फे पंधरा हजार रुपयांचा पुरस्कार 'मेरी चुंडी' (बचत) या सिंधी काव्यसंग्रहाबद्दल देण्यात आला. त्यांचे सिंधीत अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

## राजीव नाईक यांना बा.सी. मर्ढेकर पुरस्कार

इंदूर येथे ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बा.सी. मर्ढेकर पुरस्काराने राजीव नाईक यांना सन्मानित केले. प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या प्रतिष्ठानतर्फे हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी चाकोरीबाहेरचे कसदार नाट्यलेखन व अनेक नाट्यविषयक प्रयोग करून पाहणाऱ्या, राजीव नाईक यांच्या नावाची शिफारस केली आहे.



## संजीव लाटकर यांना पुरोहित पुरस्कार

कथाकार के.ज. पुरोहित यांच्यातर्फे देण्यात येणारा उत्कृष्ट 'शांताराम कथा' पुरस्कार यंदा 'दैनिक लोकमत'चे मुंबई आवृत्तीचे कार्यकारी संपादक संजीव लाटकर यांना देण्यात आला. १९९९ साली प्रसिद्ध झालेल्या दिवाळी अंकांमधील सर्वोत्कृष्ट कथा म्हणून संजीव लाटकर यांच्या 'पंखा' या कथेची निवड करण्यात आली आहे.

## दोघा डॉक्टरांची कविता ठरली दिग्विजयी...

A Candle-Flame to Monk
A Candle Flame Fluttered
and extinguished
for it Wished not to be tarnished.
said, ``Ye, monk, mind your deeds
black,character is
What u man does in the dark.

–डॉ. हेमंत विंझे यांची ही कविता आता 'साउंड ऑफ पोएट्री'वर गाणे म्हणून ऐकता येईल. डॉ. हेमंत विंझे आणि डॉ. अभिजय करंदीकर या गुरुशिष्यांच्या जोडीने नुकताच एक पराक्रम केला. पण तो वैद्यकक्षेत्रात नव्हे तर कवितांच्या प्रांतात. या दोघा मराठमोळ्या डॉक्टर-कम-कवींच्या इंग्रजी भाषेतील कवितांनी साता समुद्रापार भरारी मारून थेट 'द इंटरनॅशनल लायब्ररी ऑफ पोएट्री'मध्ये प्रवेश मिळवला आहे.

पोएट्री डॉट कॉम या आंतरराष्ट्रीय वेबसाईटने जगभरातून मागविलेल्या कवितांमधून या डॉक्टरद्वयीच्या सहा कवितांची 'द बेस्ट पोएम्स ऑफ द वर्ल्ड' म्हणून निवड झाली असून, लवकरच 'नेचर्स एकोज्' या ग्रंथात या कविता प्रकाशित होणार आहेत.

पोएट्री प्लाझा, मेरीलँडतर्फे या वर्षीच्या हिवाळ्यात हा ग्रंथ प्रकाशित होईल. जगभरातील २६ लाख कवींनी आपल्या कविता या स्पर्धेसाठी पाठवल्या होत्या, त्यातून या कवितांची निवड झाली, असे डॉ. विंझे यांनी सांगितले.

यापैकी डॉ. विंझे यांच्या दोन कविता पाश्चात्त्य चाली लावून 'साऊंड ऑफ पोएट्री' या वेब साईटवर ऐकू येणार आहेत. 'ज्ञानदीप' आणि 'ए कँडल फ्लेम टू मंक' या कविता वैद्यक व्यवसाय करीत असतानाच सुचल्या, असे डॉ. विंझे म्हणाले.

डॉ. विंझे आणि डॉ. करंदीकर हे दोघे वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी इंटरनेटवर वेबसाईट तयार करीत होते. हे काम चालू असताना योगायोगाने त्यांनी पोएट्री डॉट कॉम ही साईट पाहिली आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित अशा आपल्या कविता पाठवून दिल्या.

आपल्या कवितांना मिळालेले हे यश आणि आंतरराष्ट्रीय दाद हे सारे काही कल्पनेच्याही पलिकडले आहे, या दोघांनीही सांगितले.

वैद्यकीय शिक्षण घेत असताना डॉ. करंदीकर यांनी लिखाणही चालू ठेवले होते. त्यांना 'नेहरू पारितोषिक'ही मिळाले. डॉ. विंझे यांना वाङ्मय निर्मितीसाठी महाराष्ट्र सरकारचे तीन पुरस्कार आणि विज्ञान प्रसार कार्यासाठी राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे.

## निरंजन उजगरे यांना राष्ट्रीय फेलोशिप

भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाकडून विविध संशोधन कामांसाठी दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय फेलोशिप्स नुकत्याच जाहीर झाल्या असून सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक निरंजन उजगरे यांची सिनिअर फेलोशिपसाठी निवड झाली आहे.

बावीस प्रमुख भारतीय भाषांमधील स्वातंत्र्योत्तर कवितांचे संशोधन आणि निवडक कवितांचे मराठीमध्ये अनुवाद करून संग्रह तयार करण्यासाठी ही फेलोशिप देण्यात आलेली आहे. फेलोशिपचा अवधी दोन वर्षांचा आहे.

## गो. रा. खैरनार यांच्या आत्मचरित्राला पारितोषिक

मराठीतील सर्वोत्कृष्ट आत्मचरित्राला मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रा. वि. ह. कुलकर्णी पारितोषिकासाठी गो. रा. खैरनार यांच्या 'एकाकी झुंज' या आत्मचरित्राची निवड झाली आहे. हे आत्मचरित्र पुण्याच्या पुष्प प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. प्रा. नीलिमा भावे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## डॉ. बाबुराव गुरव यांच्या ग्रंथास रा. तु. पाटील पुरस्कार

खानापूर तालुका मराठी साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा रा. तु.पाटील साहित्य पुरस्कार परिवर्तनवादी ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा. डॉ. बाबूराव गुरव यांच्या 'उजळती प्रकाशरेषा' या ग्रंथास प्रदान करण्यात येणार आहे.

रोख २००० रुपयांचा प्रथम पुरस्कार डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'विद्रोही तुकाराम' या ग्रंथास गतवर्षी प्रदान करण्यात आला होता.

## डॉ. पसारकर यांना विश्वभारती पुरस्कार

सोलापूर येथील डॉ. शे. द. पसारकर यांना वाराणसी येथील जगद्गुरू विश्वाराध्य विश्वभारती हा पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार २० फेब्रुवारी रोजी वाराणसी येथे प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी हा पुरस्कार वाराणशीचे पंडित देवस्वरूप मिश्र, पंडित व्रजवल्लभ द्विवेदी, बंगळूरचे डॉ. एम. शिवकुमार स्वामी आणि गुलबर्ग्याचे डॉ. चंद्रशेखर कपाळे यांना मिळाला होता.

डॉ. पसारकर गेल्या २५ वर्षांपासून वीरशैव मराठी साहित्याचे संशोधन व संपादन करीत आहेत. त्यांची आतापर्यंत ३५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'वेलू गेला गगनावेरी' ही कादंबरी, 'अमृताचा घनू' हे अभंगविवरण, 'गाथारती' हे गाथाभाष्य आणि 'जन्म हा अखेरचा' हे अनुवाद-संपादन ही पुस्तके विशेष गाजली आहेत.

## डॉ. पीतांबर सरोदे यांना गंगा शरणसिंह पुरस्कार

नंदूरबार येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पीतांबर सरोदे यांना केंद्रीय मानवी साधनसंपत्ती विकास खाते व केंद्रीय हिंदी संस्थानतर्फे हिंदीतील 'गंगा शरणसिंह पुरस्कार' जाहीर झाला आहे.

हिंदीच्या क्षेत्रात केलेले अध्ययन, अध्यापन, लेखन, प्रचार-प्रसार, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील चर्चासत्रांमधील सहभाग यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. राष्ट्रपती के.



आर. नारायणन यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आहे. डॉ. सरोदे हे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे (पुणे) विश्वस्त आहेत. सभेतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'राष्ट्रवाणी' या द्वैमासिकाचे ते संपादक सदस्य आहेत.

## शाहीर बापुराव विभुते यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार

पुणे महापालिकेतर्फे दरवर्षी देण्यात येणारा लोकनाट्य आणि लोककला क्षेत्रातील पठ्ठे बापूराव पुरस्कार सांगली येथील शाहीर बापुराव विभुते यांना जाहीर करण्यात आला आहे. तसेच लोकनाट्य क्षेत्रातील पुढील कलाकार यांना एक हजार रुपये रोख देऊन गौरवण्यात येणार आहे. नृत्यांगना सुशीला महाले, ढोलकीवादक पांडुरंग घोटकर, गायिका निर्मला काळोखे, पेटीमास्तर नामदेव सुखदेव लाखे आणि तबला वादनसाठी डॉ. राजीव दूरकर यांची निवड करण्यात आल्याची माहिती महापौर दत्तात्रय गायकवाड यांनी दिली. मुख्य पुरस्कार हा अकरा हजारांचा आहे.

विभुते (वय ७०) यांनी गेली पन्नास वर्षे शाहिरी कला सादर केली असून आतापर्यंत १०४ पोवाडे, सात वगनाट्ये, पाच ग्रामीण नाट्ये, सात शाहिरी फटके आणि तीन हजारांवर गीते रचली आहेत. शाहीर विभुते १९८१ साली जपानच्या दौऱ्यावर भारताच्या सांस्कृतिक पथकातून गेले होते. १९९१ साली त्यांना महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरविले आहे.

## ना. धों. महानोर पुरस्कार

निसर्गकवी ना. धों. महानोर यांच्या नावाचा काव्यपुरस्कार मल्लिका अमर शेख यांना देण्यात आला.

## बहिणाबाई पुरस्कार

माझी कविता जगात एकट्या सोडून गेलेल्या मुलीची अनुभवसिद्ध कविता ठरली आणि म्हणूनच तिने संकेत व्यवस्था झुगारून दिली व वेगळेपण जोपसले. आजच्या पुरस्काराने माझ्या कवितेला पुन्हा नवे कोंब येतील, असे भावपूर्ण उद्गार प्रख्यात कवयित्री सौ. प्रभा गणोरकर (मुंबई) यांनी चोपडा येथे बहिणाबाई चौधरी काव्यपुरस्कार स्वीकारताना काढले.

अध्यक्षस्थानी ना. सुरेशदादा जैन होते. विधानसभा अध्यक्ष ना. अरुणभाई गुजराथी, कवी ना. धों. महानोर, जैन चॅरिटीजचे अशोक जैन, ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके (प्रभा गणोरकर यांचे पती), बहिणाबाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष वसंतराव पाटील. त्यांच्या पत्नी सौ. वर्षा पाटील (पुणे) हजर होते.

सौ. पूर्णिमा हुंडीवाले यांच्या 'दिवसभर' ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशनही ना. धों. महानोर यांच्या हस्ते झाले. बहिणाबाई पुरस्कारामागची भूमिका वसंतराव पाटील यांनी मांडली. प्रा. रामराव राजपूत (सोयगाव) यांनी पुरस्कार विजेत्या प्रभा गणोरकर व मल्लिका अमर शेख यांच्या साहित्यसंपदेचा परिचय करून दिला.

## श्री. ना. पेंडसे यांना जनस्थान पुरस्कार

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी यंदा ज्येष्ठ कादंबरीकार श्री. ना. पेंडसे यांची निवड करण्यात आली आहे.मराठी साहित्यात विशेष मोलाची कामगिरी करणाऱ्या श्रेष्ठ साहित्यिकास हा पुरस्कार दर दोन वर्षांनी देण्यात येतो.

'मला पुरस्कार किंवा सन्मानाची फारशी फिकीर नाही. मी कधी प्रसिद्धीची पर्वा केली नाही, प्रतिकुलतेची फिकिर केली नाही. आयुष्यात मी फक्त साहित्याशी बांधील राहिलो. पण ज्या माणानं आयुष्यात विशिष्ट मूल्ये जपली, त्या कुसुमाग्रजांचे नाव या पुरस्काराशी निगडित आहे,त्यांच्यासाठी मी हा पुरस्कार स्विकारणार आहे. माझ्या पहिल्या कादंबरीला, एल्गारला जेंव्हा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा १०० रुपयांचा पुरस्कार मिळाला,त्या वेळचा आनंद काही औरच होता. तसा आनंद व पुरस्काराचे महत्त्व आज मला राहिलेले नाही' असे मत आपली प्रतिक्रिया नोंदवताना श्री. ना. पेंडसे यांनी व्यक्त केले.

## ऑक्टोबर २००० स्पर्धा निकाल

**निकाल** - अणसार- अंजनी नरवणे,द फोर्थ के- वनिता सावंत, बिझिनेस महाराजे- अशोक जैन, अग्नीपंख- माधुरी शानबाग, एक एक पाऊल- भारती पांडे, चौघीजणी - शान्ता शेळके, नॉट विदाउट माय डॉटर- लीना सोहोनी, द्वंद्व- वनिता सावंत

**यशस्वी स्पर्धक**

१) **दाळपुसे रमेश कोंडिबा-** मु.पो. गिरगाव, ता. वसमत, जि. हिंगोली

२) **इम्तियाज गौस-** द्वारा ज्योती कॅन्टीन,ज्योती महाविद्यालय,क्लब रोड,कॅम्प,बेळगाव - ५९०००१

३) **मिलिंद वसंतराव महाराज-** डॉ. आंबेडकर वाचनालय, नगरपालिका, कंधार-४३१७१४

## नोव्हेंबर २००० स्पर्धा निकाल

**निकाल**- किशोर, जत्रा,ललित, किस्त्रीम, दक्षता, छावा, मार्मिक,लोकसत्ता, सकाळ, दीपावली, माहेर, मौज, आवाज, लोकप्रभा, मन:शक्ती,शतायुषी, ग्राहकहित, अंतर्नाद,कुमार, हंस, लोकमत, सामना, जी, सई

या स्पर्धेत एकही स्पर्धक यशस्वी होवू शकला नाही.

**यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन!**

आपण आपल्या पसंतीची १००रु.किंमतीची पुस्तके कळवावी.

**आमचा पत्ता** - मेहता मराठी ग्रंथ जगत, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६,सदाशिव पेठ, मुलांच्या भावे हायस्कूल जवळ, पुणे-३०



# श्रद्धांजली

## ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर

ज्येष्ठ नाटककार, साहित्यिक प्रा. वसंत कानेटकर यांचे ३० जानेवारी रोजी निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या इच्छेनुसार, त्यांच्यावर अत्यंत साधेपणाने अंत्यसंस्कार करण्यात आले.

'रायगडाला जेव्हा जाग येते', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'हिमालयाची सावली' यासारख्या अभिरूचीसंपन्न नाटकांचे लेखन करून मराठी रंगभूमीला जणू जीवनदानच देणारे नाटककार आपल्यातून गेले, बालगंधर्वांनंतर मराठी रंगभूमीवरील दुसरे सुवर्णयुग लोप पावले, अशा शब्दांत मराठी नाट्यसृष्टीतील ज्येष्ठ रंगकर्मींनी वसंत कानेटकर यांना आपली श्रद्धांजली वाहिली.



मराठी साहित्यात आणि विशेष करुन नाट्यसंपदेत मोलाची भर घालणारे ज्येष्ठ नाटककार म्हणून महाराष्ट्रातील नाट्यप्रेमींमध्ये आणि रसिकांच्या मनात घर करून राहिलेले वसंत शंकर कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे झाला. एम. ए पर्यंत शिक्षण झाल्यानंतर १९४६ ते १९७३ पर्यंत हं. प्रा. ठा. महाविद्यालय, नाशिक येथे मराठी व इंग्रजी विषयांची अध्यापन त्यांनी केले. १९७३ मध्ये केवळ लेखनासाठी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. १९५७ ते १९७७ या काळात त्यांनी ४१ नाटके, सात एकांकिका, चार कादंबऱ्या, तीन कथासंग्रह आदी मिळून त्यांचे सुमारे ६० ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.

१९९२ साली त्यांना भारत सरकारतर्फे पद्मश्री' देऊन गौरविण्यात आले.

त्यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

## श्री.के.एस.पाटील


पुण्यातील एक सुप्रसिद्ध ग्रंथ व्यावसायिक पाटील एन्टरप्राइझेस या ग्रंथ वितरण संस्थेचे श्री. के. एस. पाटील यांचे शुक्रवार दि. ९ फेब्रुवारी २००१ रोजी सकाळी ५.३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी व दोन मुले आहेत.



श्री. पाटील गेली सुमारे ४० वर्षे ग्रंथव्यवसायात आहेत. सुमारे १५ वर्षांपूर्वी त्यांनी 'निवेदिता बुक हाऊस' या नावाने भागीदारीत व्यवसायास सुरूवात केली व पुढे 'पाटील एन्टरप्राइझेस' या नावाने आपल्या दोन मुलांसह ग्रंथवितरणाचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. प्रकाशन व्यवसायातील अनेकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

गावोगावी ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन करणे हे एक त्यांचे वैशिष्टय होते. एक अत्यंत उत्साही आणि नेकीचा ग्रंथ व्यावसायिक अशी त्यांची ख्याती होती. ग्रंथप्रसार हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे ते त्यांच्या व्यवसायाकडे एक केवळ अर्थार्जनाचा मार्ग म्हणून न बघता एक सांस्कृतिक जबाबदारी म्हणून बघत असत. त्यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

**पुस्तक परिचय**




# आमार मेयेबेला

**अनु. मृणालिनी गडकरी**

## तसलिमा नासरिनच्या कौमार्यातले उद्ध्वस्त भावविश्व

तसलिमा नासरिन या बंगाली लेखिकेचे नाव गेली काही वर्षे जगभरच्या रसिक वाचकांच्या परिचयाचे आणि काहीशा चिंतेचे झालेले आहे. सलमान रश्दी याला 'दि सॅटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीत प्रेषितांबाबत दाखवलेल्या काही घटनांबद्दल इराणच्या खोमेनीने मृत्युदंड देण्याचा फतवा काढला. जो कोणी त्याला ठार करील त्याला एक कोटी रुपये दिले जातील, अशी घोषणा केली. त्यामुळे त्याला अज्ञातवासात जावे लागले. तसलिमा नासरिन हिने लज्जा या कादंबरीत बंगालमधील हिंदू शेजाऱ्यांवर झालेल्या अत्याचाराचे वर्णन आपल्या कादंबरीत केले; त्यामुळे तिलाही अशाच मृत्यूदंडाची सजा जाहीर केली गेली. शेवटी तिच्यावरही देश सोडून जाण्याची पाळी आली. सध्या ती पॅरिसमध्ये राहते. आपल्या आजारी आईची शुश्रुषा करण्यासाठी तिला मोठ्या मुश्किलीने काही दिवस बांगला देशमध्ये येण्याची परवानगी देण्यात आली; पण तेथेही तिला चोरून छपून राहावे लागले.

तसलिमा नासरिनने अज्ञातवासात राहूनही आपले लेखन जोरात चालू ठेवले आहे. लज्जा पाठोपाठ फेरा, निर्वाचित कलाम, निर्वाचित कविता, नष्ट मेयेर नष्ट गद्य वगैरे तिची पुस्तके गेल्या चार वर्षात प्रकाशित झाली आहेत. मध्यंतरी ती भारतातही येऊन गेली. मुंबईत तिच्या 'फिट्टमफाट' या अनुवादाचे प्रकाशन झाले. १९९९ मध्ये तिने लिहिलेल्या आमार मेयेबेला या नव्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचा मराठी अनुवाद माझं कुवारपण या नावानं प्रसिद्ध झाला आहे. मृणालिनी गडकरी यांनी मूळ बंगालीवरून हा अनुवाद अत्यंत तन्मयतेने केला आहे. मूळ बंगालीचा गोडवा त्यात उतरला आहे. 'आमार मेयेबेला' म्हणजे 'माझा मुलगीपणाचा काळ.' वयाच्या तेराचौदा वर्षापर्यंतच्या आठवणी या पुस्तकात आहेत. तिचेच कुटुंब या लेखनातून वाचकांपुढे उभे राहते. त्या कुटुंबाचे किंवा आई-वडिलांचे उदात्तीकरण त्यात केलेले नाही. उलट त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वास्तव दर्शनच त्यात घडवलेले आहे;



आणि ते बरेच परखड तसेच कठोरही आहे.

तसलिमाचे वडील रजब अली डॉक्टर आहेत. देखणे व बुद्धिवादी आहेत. अहंकारी-अहंमन्य आहेत. मुलांना शिकवून मोठे करण्याची त्यांची जिद्द आहे. तसेच आपल्या पुरुषपणाचा त्यांना अभिमान आहे. तिची आई (ईर्दून) कुरूप आहे. कमी शिकलेली आहे. त्यामुळे तिच्यात एक प्रकारचा न्यूनगंड आहे. आपला देखणा आणि हुशार नवरा कधीही आपल्याला तलाक देऊन घराबाहेर काढील, दुसऱ्या बायांबरोबर रममाण होईल म्हणून ती सतत धास्तावलेली असते. रात्रीच्या रात्री तळमळत काढते.

त्याच काळात तस्लिमाची आई खूप तणावात होती. कारण तिचा नवरा कोणातरी रजिया बेगमच्या नादी लागलेला होता. आई काळी, नारळासारखे डोके, छोटे डोळे, चपटे नाक, हडकुळे पाय.तर रजिया बेगम गोरीपान,काळेभोर डोळे, संत्र्याच्या फोडीसारखे ओठ. कंबरेपर्यंत लांब केस. विशाल स्तन (दूध काढलं असतं तर दोन बाटल्या भरल्या असत्या!– तसलिमाची कल्पना.)आणि शरीर म्हणजे लहानसा डोंगर. चालताना जमीन हादरायची! (२५)

या विजोड जोडप्याला चार मुले आहेत. दोन मुलांनंतर तसलिमा ही मुलगी. ती पायाळू असल्याने बाळंतपण अवघड होते. दवाखान्यात नेण्याआधीच पाय बाहेर येतात पण डोके बराच वेळ आतच राहते. ॲनॉटमीचा शिक्षक असलेल्या नवऱ्याने बायकोवरच प्रयोग करून, दोन्ही हातांची बोटे आत घालून ताक घुसळल्याप्रमाणे बोटांची हालचाल करून मुलीच्या मानेभोवतीचा नाळेचा वेढा सैल केला आणि अल्लाचा धावा केला. तेव्हा कुठे तसलिमाचे या जगात अवतरण झालं. तिच्या रडण्याने सर्वांना हायसे वाटले. घरात राजकन्या जन्माला आलीय म्हणून सारे आनंदाने नाचू लागले. मडकंभर मिठाई वाटण्यात येते. जन्मतःच ती अधिक वजनाची होती. टेबलावर झोपवलं तर टेबलाचा अर्धा भाग व्यापला जायचा. एवढं मोठं मूल जन्मताना त्याआधी कुणी पाहिलेलं नव्हतं.

तिचे वडील हे घरजावयासारखे तिच्या माहेरी राहात. त्याचंही तस्लिमाच्या आईला मोठे दुःख वाटे. ईर्दूनचा नवरा घरजावई झालाय हे वाक्य तिला अपमानास्पद वाटे. ती नवऱ्याला म्हणे, "एवढे डॉक्टर झालाय. पैसे कमवताय. सासुरवाडीला किती दिवस राहणार? लोक काय वाटेल ते बोलतात. बायकोमुलांना घेऊन वेगळं बिऱ्हाड करायची ताकद नाही तुमच्यात?" छोट्या तसलिमाला आई नेहमी म्हणे, "मी मेले तर तू रडशील, पोरी?" तसलिमा म्हणायची, "नाही नाही. तू मरणार नाहीस. तू मेलीस तर मीही मरून जाईन."... लाड, प्रेम, हेळसांड यांचा अनुभव घेत तसलिमा मोठी होत राहिली. एक वर्षाची ती झाली तेव्हा वडिलांची पाबनाला बदली झाली; आणि पाबनाच्या तुरुंगातच क्वार्टर्स मिळाले. रजिया बेगमच्या कचाट्यातून नवरा सुटला याचे ईर्दूनला मोठेच समाधान होते. पण वर्षभरातच डॉक्टर नवऱ्याने आपल्या मूळ गावी मयमनसिंहला बदली करून घेतली; आणि ईर्दूनच्या त्या सुखाला तडा गेला. नशीब एवढंच की यावेळी सासरी न राहता, तेथेच दोन खोल्या विकत घेऊन डॉक्टरांनी वेगळं बिऱ्हाड केलं. पण आईला नवरा कधी आपल्याला टाकून देईल याची धास्ती कायम वाटत राही.

तसलिमा स्वतःचे पूर्वायुष्य, त्यात येऊन गेलेल्या व्यक्ती, त्यांचे वागणे-बोलणे, त्यांचे

स्वभावविशेष, त्यांच्यातील हेवेदावे यांच्याबद्दल मोकळेपणाने लिहिते. औचित्य-अनौचित्याचे दडपण न ठेवता लिहिते. त्या त्या वेळच्या मूडप्रमाणे बऱ्यावाईट प्रतिक्रिया व्यक्त करते. आई-वडील, भावंडे, मावशा, आजी-आजोबा, तीन मामा. कधी त्यांच्याकडे आत्मीयतेने बघितले जाते. कधी त्यांच्याबद्दल तटस्थतेने किंवा टीकाटिपणीच्या रूपात लिहिले जाते. त्यात उपहास वा कडवटपणाही येत राहतो. हेत्वारोपाचाही अवलंब केला जातो. आपल्या वडिलांचा उल्लेख रजब अली असा करीत, लग्नानंतर ते सासरी राहायला आले, त्यावरील प्रतिक्रिया पुढील शब्दात व्यक्त होते : ''ह्या घरी मात्र स्वतः सासूबाई कुर्मा, माशाचं कालवण, दोप्याजा करून पानात वाढत. आणि पंख्यानं वारा घालत. सासू-सासरे आणि भरपूर मेव्हणे-मेहुण्या बडदास्त ठेवायला असल्या म्हणजे बायको कशीही असली तरी चालते. अशाच एका घराची आणि माणसांची रजब अलीला गरज होती. म्हणजे मग शरीर आणि मन दोन्हीही चांगलं राहते.'' (३३)

'नासरिन' हे नाव दादाच्या आग्रहावरून ठेवण्यात आले. त्या वेळचा किस्साही मजेदार आहे. रुनुमावशीला शोभा नाव पसंत होतं. रुनु मावशीला पापडी; मामाला उषा; आणि दादाला नासरिन. त्याचं नाव चालणार नाही म्हटल्यावर दादा चक्क गाठोडं बांधून म्हणतो, ''गेलो. वाट फुटेल तिथं जाईन.'' आणि तो खरोखरच घर सोडून जातो... रात्री दहा वाजता जंगलातून त्याला मामा शोधून आणतात. त्यानं सांगितलेलं नाव ठेवतात. 'नासरिन जहाँ तसलिमा' राजकन्येला असलं खेडवळ निरर्थक नाव ठेवलं म्हणून मामा मावशा नाराज होतात. (३५)

आपल्या आईच्या वडिलांबद्दल म्हणजे नानांबद्दल नासरिन म्हणते, ''विक्रमपूरचा एक उडाणटप्पू मुलगा म्हणजे माझे नाना. तेराव्या वर्षी सावत्रआईच्या जाचानं वडिलांच्या पेटीतून पैसे चोरून घरातून पळाले, ह्या शहरातून त्या शहरात असं फिरत फिरत मयमनसिंहला आले तेव्हा अगदी कंगाल झाले होते. मशिदीत राहत. खायला झोपायला पैसे लागत नसत. तेथील इमाम त्याला आपल्या घरी नेतो; खाऊपिऊ घालतो. आपल्या मुलीबरोबर त्याचे लग्न लावून देतो. ''आता तूच माझा मुलगा'' म्हणून जावयाला जमीनजायदाद देतो. पण हा घुमक्कड जावई मानरुद्दिन वर्षाच्या आतच अर्धीअधिक जमीन जायदाद विकून टाकतो आणि पैसे भिकाऱ्यांना वाटून टाकतो. तेव्हा उरलेल्या जमिनीवर खैरूनिसा पत्र्याच्या खोल्या बांधून, झाडं लावून, वर्षाला हलणाऱ्या पाळण्याची सोय करते. 'आता तिला नुसतं मोठं मन असणं परवडण्यासारखं नव्हतं.' .... ती नवऱ्याला खानावळ काढायला लावते. ती धर्मशाळेसारखी तो चालवतो. त्याला पैसा मोजायची सवयच नसते. पन्नास सालच्या दुष्काळात नवऱ्यानं खानावळ बंद करून अन्नछत्र सुरू केलं. दुष्काळात वर्षभर ते रडत होते. खैरुन्निसानं दुष्काळाची झळ घराला लागू दिली नाही. (४३)

तसलिमाला वडील हे नेहमीच परके वाटत राहिले. ''नानी, रुनुमावशी, झुनूमावशी, हाशिम, शरीफमामा, फेलुमामा एवढंच कशाला भटके नानाही मला आपले वाटायचे, पण बाबा नाही. मी, आई, दादा, छोटादादा– आमचं घर मस्त होतं. जणू शांत पाण्यात एक दगड येऊन पडला– माझी भातुकली उधळून लावली. तेव्हापासून माझ्यात आणि बाबांच्यात एक दुरावा निर्माण झाला. एक अदृश्य भिंत निर्माण झाली.'' (४६) एमबीबीएसची परीक्षा देऊन आल्यावर तसलिमा बाबांना ओळखूही शकत नाही. ''कोणीतरी अनोळखी माणूस घरात घुसलाय असे वाटले, इतकी ती त्यांना विसरून गेलेली असते.''

लहानपणी तसलिमाचे सवंगडी म्हणजे तिचे मामा; तिचे मोठे भाऊ. टुटु मामा वेडावाकडा पळणारा. फेलुमामा सशासारखा चपळ. विटीदांडू, गोट्या, सिगारेटच्या पाकिटांचा च्याडा हा खेळ, लपाछपी, चोरशिपाई वगैरे खेळता खेळता आपला रंग पार करपून गेला असे तसलिमाला वाटते. (४८) नंदीबाडीच्या शर्मिला या मैत्रिणीकडे रुनूमावशी तिला घेऊन जाते. ती मिठाई खाण्याला नकार देते. घरी आल्यावर अभिमानानं सांगते, ''मी हिंदूंच्या घरातलं काहीही खाल्लं नाही. कपाळावर कुंकू लावलं नाही.'' (५०)

शाळेत पहिल्याच दिवशी तसलिमा आरडाओरड करून गोंधळ घालते. मास्तर तिला मांडीवर घेऊन गाणं म्हणतात. नंतर चित्र काढायला सांगतात. तसलिमा घड्याचं चित्र काढून त्याच्या गळ्यात फुलपानांची माळ घालते. मास्तर म्हणतात, ''ही मुलगी एक दिवस मोठी चित्रकार होणार.'' (६०)

राजाबाडी शाळा एकेकाळच्या राजवाड्यात भरे. शाळेत जाईपर्यंत आपण राजा आहोत असं तिला वाटायचं. पण वर्गातल्या मुलामुलींत गेल्यावर मात्र आपण बावळट, मूर्ख आहोत असं समजून ती मागं मागं राहायची.

शरीफमामा तिला एकदा तिला गंमत दाखवायला म्हणून मागच्या खोलीत नेतो आणि तिला खाटेवर झोपवून तिला आपली गंमत दाखवतो. ''हा खेळ जगातले सगळे करतात. तुझे आईबाप. माझे आईबाप.'' तिला घाणघाण वाटते. (७१) ती पुन्हा नानीकडे जायला तयार होत नाही. त्यामुळे आई तिला हट्टी म्हणते. विक्षिप्त ठरवते. मामाने काय केले हे ती सांगू शकत नाही. रडणेही तिला जमत नाही. (८४) अरबी भाषा शिकायचे म्हणजे तिला संकट वाटे. कुराणातील कायदा सीपारा अध्याय टाळून ती परीकथांची पुस्तके वाचायची. चित्रे काढायची. 'माणसाचं चित्र काढलं तर पाप लागतं', असं तिला पुनः पुन्हा बजावलं जातं; पण तिला माणसाचं चित्र काढण्यातच रस वाटतो. एकदा ती नाव काढते. तिच्यात नावाडीही बसलेला दाखवते. तर आई तिच्या रंगीत पेन्सिली काढून घेते. तसलिमा उदास होते. (८६) ''नमाज पढ. नमाज पढलीस तर अल्लाला तू आवडशील. मग तू जे मागशील ते तो तुला देईल.'' असे आई म्हणते. तसलिमा स्वतःला खूप पापी समजते. शरीफमामानं जे केलं ते आपलं पाप असेल का? त्या पापामुळेच अल्ला आपला तिरस्कार करीत असेल का असा प्रश्न तिला पडे. (८७) अनामुद्दोला काका हाही एकदा तिला खोलीत घेऊन लुंगी वर करतो; आणि धमकावतो, '' हे कोणाला सांगू नकोस.'' सात वर्षे वय असलेल्या तसलिमाच्या जांघेत भयंकर दुखते पण ती कोणाला काही सांगत नाही. (९४)

१९७० मध्ये तसलिमाचे वडील आमलापाडाच्या प्रशस्त घरात रहायला येतात. मोहल्ल्यातले सर्वात उंच घर. मोठ्या खोल्या. उंचउंच खांब. अडतीस पायऱ्या. लांबलचक व्हरांडा. त्याच वेळी आई एकदा आपल्या नवऱ्याला रजिया बेगमबरोबर रिक्षातून जाताना बघते; आणि संतप्त होते. नवऱ्याला म्हणते, ''माझ्या वडिलांनी शिकवलं म्हणून डॉक्टर झालास. नाहीतर

शेतकरीच राहिला असतास. पैशाच्या लोभानं माझ्याशी लग्न केलंस. आता मला दूर सारून दुसऱ्याच्या बायकोबरोबर रंगढंग करतो आहेस. अल्ला तुझा सत्यानाश करील. मी शाप देते तुला... तुझ्या घरच्या चौदा पिढ्या महारोग होऊन मरतील.'' ती तसलिमालाही म्हणते, ''हराम्याची अवलाद. मोठा आलाय बापाचा पुळका! येणारच म्हणा! एकच रक्त आहे ना! बदमाशाचं रक्त! कैदाशीण कुठची! तू जन्मापासून छळत आलीस मला! तुझ्या जन्मापासून नशीब फुटलं माझं. जन्मल्याबरोबर तुला मीठ चाटवून मारून का नाही टाकलं मी तुला– कोण जाणे!'' (९९) अशी आईची भाषा दिवसेंदिवस शिवराळ व गलिच्छ होत जाते. बाहेरून आलेल्या नवऱ्याला ती एकदा म्हणते, ''हडळीबरोबर थेर करून आला. रंडीबाज बदफैली.'' (१००) तेव्हा रजब अली तिच्यावर झडप घालून तिला लाथा घालतो. नंतर हाशिममामा रजब अलीला भर रस्त्यात बेदम मारतो आणि म्हणतो, ''पुन्हा जर माझ्या बहिणीवर हात उगारलास तर ठार मारून तुझं प्रेत कुत्र्यापुढं टाकीन. याद राख.'' सात दिवस अंथरुणातून त्याला उठता येत नाही! (१०१). आईने दिलेले सरबत घेऊन तसलिमा त्याला देते तर तो म्हणतो, ''हे अंगणात फेकून दे. मला विष देऊन मारायचा बेत आहे तिचा!''

याच वेळी फजली मावशी आईला सांगते, ''बडबू, संसार सोड आता. आणखी पाप करू नकोस. संसार, नवरा, मुलं ह्या सगळ्यांची माया सोड. अल्लाच्या मार्गावर ये. तोच शांतीचा मार्ग आहे.'' आणि आई फजलमावशीचा सासरा अमीरुल्लाह याच्याकडे जाऊ लागते. तो भूत उतरविणारा, अल्लाचा वारस पीर म्हणून प्रसिद्ध. अल्ला आपल्या वारसांना दर्शन देतो. अमीरुल्लाहलाही अल्लाचे दर्शन वरचेवर होत असे या ख्यातीमुळे तरुण स्त्रिया त्याची सेवाचाकरी करीत. त्याच्या सेवेवरून बायकात भांडणे होत. कोण डोके चेपणार? कोण पाय चेपणार?... दोन तास अंग चेपण्याचा कार्यक्रम चाले. मग खानपान. चांदीच्या ताटात रहू माशाचा दोप्याजा, कोंबडीचा रस्सा, खीर. वर वर्ख लावलेलं पान. तस्तातली पिंक उचलण्यासाठी बायकात धक्काबुक्की चाले. पीर असलेला महापुरुषाचं उष्टं पान खाल्लं म्हणजे स्वर्गात जागा पक्की! पानच नव्हे तर अल्लाच्या वलीचा कफ, थुंकी हे सुद्धा ग्रहण केल्यानं पुण्य मिळतं असा समज! आई तसलिमाला आग्रह करी : हुजुरांना पाहताच पायाचं चुंबन घे. (११२)

रजबअली आपल्या बायकोला अमीरुल्लाहकडे जाऊ नये असे म्हणतो तेव्हा ती म्हणते, ''अडलंय माझं खेटर. ह्या घरात राह्यचंय कोणाला? जिथं अल्लाखुदाचं नाव घेतलं जात नाही अशा काफिराच्या घरात? ह्या घरात राहिले तर मला स्वर्ग पारखा होईल.'' (११३). ती स्वयंपाकपाणी सोडते. कुराणपठण, नमाज यात वेळ घालवते. तसलिमाला म्हणते, ''ह्या काफिराच्या संसारात मी तुम्हाला घेऊन राहतेय. काफिराचं अन्न खाणं हा अपराधच होय. तुम्ही अल्लाच्या मार्गानं नाही आला तर मी घर सोडून जाईन.'' पीरसाहेबांनी आईचे नाव बदलून हामिमा रहमान ठेवले. त्यामुळे तसलिमाला व सर्वांना नसीहत (उपदेश) देणे हा आपला अधिकारच असे तिला वाटू लागते. ''मी जे वाचतेय ते मला कळत नाही'' असे तसलिमाने कुराण वाचताना म्हटले तर आई सांगते, ''अर्थ कळायला पाहिजे असे नाही. अल्लाचं पुस्तक वाचलं तरी सवाब होतो. पुण्य लाभते.'' मोठी मुले तिचे ऐकत नाहीत तेव्हा



ती म्हणते, ''ह्या घरात सैतान शिरलाय. सगळेच्या सगळे काफिर झालेत. मुलांचा मला भरवसा वाटत होता. पण तीही वाया गेलीत. अल्ला, मला या सगळ्यांपासून दूर ने बाबा.'' (११७). [तसलिमा मिस्किलपणे यावर शेरा मारते– *पण अल्लहो त ऑलानं आईचं ऐकलं नाही. आई आम्हाला सोडून गेली नाही... अमीरुल्लाह काहीतरी युक्ती करून आईसाठी स्वर्गाचं तिकिट मिळवतीलच असा आईला विश्वास वाटत होता.* (११८)]. रात्री उशिरापर्यंत आईने पीरवाडीला राहू नये म्हणून रजबअली फाटकाला कुलूप लावतो. तर आई रात्री परत पीरवाडीला जाते आणि आठवडाभर येतच नाही. तिला सन्मानपूर्वक मग घरी आणणे भाग पडते. आपल्यावाचून घराचे अडते हे लक्षात आल्यावर आईचा घरातला धाक वाढतो. ती नवऱ्याला म्हणते, ''तुमच्यासारख्या काफिराबरोबर माझा काहीही संबंध नाही. तुम्ही माझ्या आयुष्याचं वाटोळं केलंत. मी आंधळी होते. अल्लाच्या मार्गानं गेल्यावर माझे डोळे उघडलेत. ही माया, ममता सगळं झूठ आहे. ह्या संसारात अडकून पडले तर माझा सर्वनाश होईल. आखिरतला कोण येणार आहे मला मदत करायला? कोणी नाही. नवरा, मुलं, संसार काहीही आपलं नसतं. आपला फक्त अल्लाच असतो. '' (११९)

हे 'काफिर' विरोधाचं वेड पुढं फोफावत जातं. साडी हा हिंदूंचा पोशाख. साडी नेसली, तर पाप लागतं. असा पीरवाडीचा फतवा निघतो. आई आपले लांब केस कापून मानेपर्यंत ठेवते. खुर्च्या टेबलावर बसून जेवणं हराम आहे म्हणते. बागेतला बेल पूजेसाठी हिंदूंना देण्याला विरोध करू लागते. तसलिमा एकदा म्हणते, ''अल्लाच्या मर्जीनेच सर्व घडते असे तू म्हणतेस. मग अल्लानं एखाद्याला विधर्मी घरात जन्माला घातलं हा अल्लाचा दोष आहे. जन्मणाऱ्या मुलाचा दोष नाही.'' त्यावर आई तिच्या केसांना हिसडा देत तिला रागावते, ''अल्लाबद्दल वाईट बोलतेस. एवढं धाडस? पुन्हा कधी अल्लारसूलबद्दल वाईटसाईट बोललीस तर गळा दाबून जीव घेईन. मी तुला जन्माला घातलंय. तेव्हा तुझ्यासारख्या दुष्मनाला मारायचा अधिकार मला आहे. तुझ्यासारख्या पापिणीला मारलं तर मला सवाबच मिळेल.'' (१३८). तसलीमा एकदा उभं राहून पाणी पिते. तर आई बजावते, ''उभं राहून पाणी पिणं म्हणजे सैतानाचं मूत पिणं.'' पश्चिमेकडे पाय करून झोपले तर पाप लागते असे सांगते. ''शबबरातच्या रात्री अल्ला सात आकाशातून खाली येऊन दुनियेत कोण काय करतंय हे निरखून पाहतो'' असं आई सांगते तेव्हा तसलिमा विचारते. ''सात आकाशाच्या वर राहून अल्ला दुनियेतल्या माणसांना नीट पाहू शकत नाही का? त्यासाठी त्याला खाली यावं लागतं?'' तेव्हा आई डोळे वटारते. अल्लानं पुरुषांना बुरखा घ्यायला का नाही सांगितलं या तसलिमाच्या प्रश्नावर आई म्हणते, ''बायकांना अब्रूचं रक्षण करावं लागतं. बायकांचं शरीर परक्या माणसांनी बघू नये असं अल्लानं सांगितलंय. जर पाहिलं तर पाप लागतं.'' त्यावर तसलिमाची तशीच तीव्र प्रतिक्रिया असते. ''पाप पाप पाप. तीन पायऱ्या मागे सरकून उभी राहिले. पाप. डावीकडे वळले. पाप. उजवीकडे वळले. पाप. प्रश्न विचारला पाप. पाप केल्यावर अल्ला नरकात टाकणार. तिथं साप चावणार. विंचू चावणार.'' (१४१).

कुराणाचं भाषांतर तसलिमा वाचते. 'चंद्राला स्वत:चा प्रकाश आहे. पृथ्वी स्थिर आहे.

पर्वत खिळ्यांसारखे आहेत. त्यांनी पृथ्वीला अडकवून ठेवलं आहे म्हणून ती पडत नाही.' हे वाचल्यावर तिला प्रश्न पडतो ; कुराणात चुकीचं आहे की आपल्या शाळेच्या पुस्तकात चुकीचं आहे? खरं काय? विज्ञान की कुराण?'' (१४९).

रेणू ही मुलगी मोलकरीण म्हणून ठेवण्यात येते. फूटपाथवर सापडलेली ती मुलगी. रजब अली तिच्या आईचा शोध लावून तिला घरी आणतो. एके रात्री आई आपल्या नवऱ्याला व रेणूच्या आईला रंगेहात पकडते. संसार सोडायला निघालेली आपली आई रात्रभर रडतेय हे बघून तसलिमाला आश्चर्य वाटते. (१६८).

अमीरुल्लाह पीरसाहेबांकडे आईचे जाणेयेणे चालूच असते. त्यांनी आपल्या घराजवळ पत्र्याच्या व सिमेंटच्या छप्पराच्या बिनखिडकीच्या खोल्या बांधून त्यात मुलींच्या राहण्याची व्यवस्था केली होती. ''अरबस्थानात अशीच घरे होती. अशा घरात राहिल्याने पुण्य मिळते. नबीजी अशाच घरात राहिले. त्यांनी सोसले तसे कष्ट तुम्ही सोसले तर हश्रच्या मैदानात नबीजी स्वत: येऊन तुमच्या बाजूनं साक्ष देतील.'' हा त्यांचा युक्तिवाद. तिथं राहणाऱ्या मुली लग्नालाही नकार देत. कारण ''जगाचा शेवट जवळ आलाय. तेव्हा लग्न करणं योग्य नाही'' असं पीरसाहेबांचं मत होतं. (१७४).

आई नेहमी म्हणे की अल्लाबद्दल वाईटसाईट बोललं तर तुझी जीभ झडून जाईल. तेव्हा तसलिमा आपल्या खोलीत जाऊन अल्ला तू जुनाट-तू भुलवणारा वगैरे शब्द उच्चारत राही. तरीही जीभ झडली नाही-म्हणजे आई खोटं सांगते अशा निष्कर्षापर्यंत येते. अल्लाकडे काही मागितले तर तेही मिळत नाही हेही तिच्या लक्षात येते.उलट शाळेतल्या पुस्तकात लिहिलंय ते सर्व खोटं असे आईचे ठाम मत.(१८४).अल्लाला न मानणारे लोकही दुनियेत आहेत; अरबी भाषेतही अश्लील गोष्टी आहेत; वगैरे विचार तसलिमाला आपल्या कम्युनिस्ट मामाकडून ऐकायला मिळतात.एकदा हा कम्युनिस्ट मामा व्हिक्टर या गोऱ्या मित्राला घेऊन येतो. त्याबद्दल आईची प्रतिक्रिया विरोधाचीच राहते.''गोरा झाला म्हणून काय झालं?उभ्यानं लघवी केली त्यानं, नंतर पाणीही घेतलं नाही. सैतान असं करतो.शेवटी तो कम्युनिस्टच! अल्लारसूलला मानीत नाही.आधी माहीत असतं तर मी त्याला जेवायला घातलंच नसतं.'' (१८८).

तसलिमाचा छोटा दादा कमाल इंटर सायन्स होऊन मेडिकलला जायची स्वप्ने घोळवत असतो. वर्गातल्या गीता मित्र या हिंदू मुलीवर त्याचे प्रेम बसते. ते दोघे चोरून लग्न करतात. छोटा दादा न सांगता अचानक घरातून निघून जातो. बाबांचं ब्लडप्रेशर वाढतं. आई हमसून हमसून रडते. ''बदमाशांनी नक्कीच त्याच्यावर जादूटोणा केला असणार! हे का त्याचं लग्नाचं वय आहे? अल्ला माझ्या पोराला घरी परत येऊ दे.'' (२१२). बाबा म्हणतात, ''आजपासून कमालचा आणि माझा संबंध संपला. माझ्या जिवावर मोठा झाला आणि माझ्याच गळ्यावर सुरी फिरवली.'' (२१५). हाशिममामा कमालला पकडून आणतात. साखळीनं बांधतात. ''गीताला सोडून दे व अभ्यास कर.'' पण तो नाही म्हणतो. त्याला चाबकाने फोडतात. शेवटी आई म्हणते, ''सोडून द्या त्याला. तो लहानपणापासून हट्टी आहे. मारून काही फायदा नाही.'' शेवटी बाबांनाच हार खावी लागते. दोन वाघांची ही लढाई पंधरा दिवस चालते. नंतर बाबा मुलींना सांगतात. ''माझी स्वप्नं कमालनं धुळीला मिळवली. आता माझी फक्त तुमच्यावरच भिस्त आहे. मला जगू देणार ना तुम्ही? करणार ना अभ्यास?'' (२२०). दोन दिवसांनी



बाबा तेरा वर्षांच्या तसलिमाला मॉडेल स्कूलच्या हॉस्टेलवर आणि यास्मिनला मिर्जापूरच्या भारतेश्वरी होम्समध्ये पोचवतात. घरापासून पहिल्यांदाच दूर राहण्याचा हा अनुभव. क्लेशकारक. तशात रुनू मावशी पळून जाऊन रासूबरोबर लग्न करते आणि त्याच्या बेगुतवाडीच्या घरी राहू लागते. तेव्हा झुनूमावशी छाती बडवून घेते. खरंतर रासू हा झुनूचा शिकवणीचा मास्तर. तिचं त्याच्यावर प्रेम. पण रुनू मध्येच त्याला मटकावून बसते. ''पुरुष म्हणजे जनावर. डुकरापेक्षाही नीच. जी मिळेल तिला चाखतात. ह्यांना काही नीती नाही. आज एकीवर प्रेम करतील. उद्या दुसरीशी प्रेमाची भाषा करतील.'' रासूची प्रेमपत्रं ती जाळून टाकते. ''मला जगावंसंच वाटत नाही. पण पुन्हा मनात विचार येतो. मी एकटीनंच का मरावं? त्या दोघांना मारूनच मी मरेन. मला सुख नाही. मग त्यांनी का सुखात राहावं?'' (२२८).

१९७४ च्या दुष्काळात शहराकडे लोकांचे लोंढेच्या लोंढे येतात. तांदूळ दुर्मिळ होतो. रोटी खाणे भाग पडते. भाताच्या तुटवड्याने हाडांचा सांगाडा झालेली माणसे पहायला मिळत. घरावर तरुणांचा मोर्चा येतो. ''तांदूळ द्या. आम्ही गरीबांसाठी अन्नछत्र काढलेय. तांदूळ द्या.'' तसलिमा कोठाराचे कुलूप तोडून एका टॉवेलमध्ये मावतील एवढे तांदूळ घेऊन येते. तरुणांना देते. त्या मिरवणुकीत आपणही जावे असे तिला वाटते. आई त्यावेळी कमालच्या घरी जाऊन तांदूळ देऊन येते. त्याची बायको गीता आता मुसलमान अफरोजा झालेली असते. छोटादादा आता गुपचूप घरी येऊ लागतो. एके दिवशी बाबा अचानक येतात. संतापतात. घर डोक्यावर घेतात. (२४६).


ढाका विद्यापीठातील मास्टरची डिग्री अर्धवट सोडून दादा घरी येतो. नोकरी करतो. आईला साड्या-बांगड्या आणतो. आईला नवा आत्मविश्वास येतो. बाबा टोमणे मारतात. पण तो हीरोसारखा दिसे म्हणून तसलिमा खूष. त्याच सुमाराला अमानकाका रोज संध्याकाळी आईकडे येऊ लागतो. ऋतुप्राप्तीनंतर तसलिमाला आपल्या उफाड्याची जाणीव होऊ लागते. गच्चीत जाऊन कोणाच्या गालावरची खळी, ओठांवरचं हसू, केसांचा फुगा, तारुण्याचा तोरा बघण्यात ती रमू लागते. दादाही सुंदर मुलीच्या शोधात असतो. 'मी हळूहळू मोठी होत होते' या वाक्याने हे आत्मकथन संपतं.

बांगला देशच्या निर्मितीनंतर शेख मुजीबर रहमानच्या कुटुंबाचे झालेले शिरकाण वगैरे तपशील ओझरते येतात. मुख्य झोत मात्र तसलिमाच्या आईवडिलांवर आणि कुटुंबावरच पडत राहतो. तसलिमाच्या व्यक्तिमत्त्वात आणि विचारात तिच्या पारिवारिक ताण्याबाण्यांचा प्रभाव मोठाच पडलेला आहे. याची कल्पना या लेखनावरून येते. लज्जा, फेरा, निर्वाचित कलाम यांच्यातील अनेक तपशील या आत्मवृत्तावरून स्पष्ट होतात. तसलिमाचे संवेदनाशील मन पानोपानी प्रकट होते. तीच या लेखनाची खरी ताकद आहे. एका वेगळ्याच भावजीवनाचा हा आलेख अस्वस्थ करतो.

**पृष्ठे** २९५ **किंमत** : २००रु. **सवलतीत** : १७०रु. **सभासदांना** : १५०रु. **पोस्टेज** :२०रु.

'समजा, एखादं बाळ जन्माला आलं,कोणाच्या पोटी जन्माला यायचं हे त्याच्या हाती नाही. मग ते हिंदू किंवा ख्रिश्चन असलं तर ते स्वर्गात जाईल की नरकात?'

*लहान तसलिमाचा प्रश्न.*




# कांचनगंगा

**माधवी देसाई**

## भेंडीबाजार घराण्याच्या गायिका अंजनीबाई मालपेकर यांच्या जीवनावरील कादंबरी

माधवी देसाई यांची कांचनगंगा ही नवी कादंबरी. अंजनीबाई मालपेकर या गाजलेल्या गायिका, हिराबाई पेडणेकर या मराठीतील पहिल्या स्त्री नाटककार आणि सुरंगा मुळगावकर या राजा रविवर्मा यांच्या चित्रकृतींची प्रेरक शक्ती. १८८६ मध्ये जन्मलेल्या या तिघीही गोमंतकातल्या; आणि बाल मैत्रिणी. योगायोगाने त्या मुंबईत स्थायिक होतात आणि नवीवाडीतील मिशनरी शाळेत विद्यार्जनाच्या निमित्ताने एकत्र येतात. माधवीताईंना योगायोगाने या तिघींच्या सहप्रवासाची माहिती होते. मुंबईत अंजनीबाई मालपेकर यांच्या स्मृतिदिनी होणाऱ्या 'आविष्कार' संस्थेच्या संगीत संमेलनात माधवीताईंना बोलण्याचे निमंत्रण येते. त्या वेळी अंजनीबाईंवरील बा. द. सातोस्करांचा लेख त्यांच्या वाचनात येतो आणि त्यातील या तिघींच्या मैत्रीचा उल्लेख वाचून त्यांच्या जिज्ञासेला चालना मिळते. या तिघींपैकी सुरंगा विषप्राशन करते, हिराबाईंना नायकीण बनून विजनवास पत्करावा लागतो आणि अंजनीबाईंना गानसंन्यास घ्यावा लागतो. या तीन घटनांची साखळी मनात निर्माण झाल्यावर माधवीताईंना त्यांच्यावर कादंबरी लिहिण्याची इच्छा होते. या तिघींची माहिती त्या खूप परिश्रम करून मिळवतात. चारपाच वर्षे त्यावर काम करतात; आणि त्या मेहनतीचा परिपाक म्हणजे त्यांची ही कादंबरी.

दिल्लीमधील दरबार हॉलमध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते अंजनीबाई मालपेकर यांना संगीत नाटक अकादमीची फेलोशिप प्रदान करण्यात येते. त्या प्रसंगापासून या कादंबरीचा आरंभ होतो. त्या वेळी अंजनीबाईंनी पचाहत्तरी ओलांडलेली असते आणि प्रत्यक्ष बैठकीचे गाणे सोडूनही पंचवीस-तीस वर्षे झालेली असतात. अज्ञातवासातच जणू त्यांनी ती वर्षे काढलेली असतात.

दिल्लीहून परतल्यावर आपल्या गिरगावातल्या घरात शिवलीलामृताचा अकरावा अध्याय म्हणत शिवलिंगाची पूजा करताना अंजनीबाईंना बालपणीच्या वाळकेश्वरच्या मंदिरातील अभिषेकाची आठवण होते. त्या वेळी धाकटी बहीण बुची (कमला) तिच्याबरोबर असते. आजीनं सांगितलेली वाळकेश्वराची कथा आठवते. रोज काशीहून शिवलिंग आणून पूजा करण्याचा रामाचा परिपाठ. एके दिवशी लक्ष्मणाला उशीर होतो. तर राम वाळूचं शिवलिंग तयार करून पूजा करतात, तेवढ्यात लक्ष्मण येतो. मग लक्ष्मणानं आणलेल्या शिवलिंगाचीही पूजा होते. लक्ष्मणेश्वर मंदिर असे नाव त्याला मिळते. आजीला सात मुली. कलावंतांचं घराणं. गाण्याच्या छंदापायी गोव्यातलं मालपे गाव सोडून सारे मुंबईला आलेले. अंजनीची आई नबूबाई. सुंदर आवाज. जलशाची आमंत्रणे. पती नारायणराव इंजिनियर. दोन मुली, अंजनी आणि कमला. त्यांना मिशनरी शाळेत घालण्यात येते. हिरा पेडणेकर आणि सुरंगा मुळगावकर या मैत्रिणी अंजनीला मिळतात. ''कलावंत घराण्यातल्या मुलींच्या हाती तंबोऱ्याच्या आधी पाटी आली.'' म्हणून रामकाकाचे डोळे भरून येतात. अंजनीला डॉक्टर होऊन लोकांची सेवा करावी असे वाटे. रात्रदिवस उभं राहून आईनं लोकांपुढं गाण म्हणणं तिला खटकत राही. 'ही आपली परंपरा' असे आजी म्हणे. ''राजयोग आहे नशिबात. पायात सोनसाखळ्या. चांदीचं ताट. सोन्यानाण्यांची बरसात. पण राजयोगापेक्षा संन्यासयोग प्रबळ. भाग्ययोगच!'' असे तिचे भविष्य तिची वर्गमैत्रीण सुधा पाठक हिचे आजोबा वर्तवतात. (सुधा हे तेवढे काल्पनिक पात्र).

आठव्या वर्षी या दोघा बहिणींना नजिरखाँचा गंडा बांधला जातो. आपल्या भेंडीबाजार घराण्याची गायकी चालवणाऱ्या शिष्यांचा शोध नजिरखाँ घेत असतात. तीन वर्षांच्या शिक्षण काळात आवाजाला गोलाई येते, तानांचे पलटे दाणेदार पडू लागले. गळा तयार होऊ लागतो. कोणी एक मुनशीसाब उर्दूचे धडे देऊ लागतात. गाण्याचा अर्थ समजून ते गाणं महत्त्वाचं– असा नजिरखाँचा आग्रह.

चौदाव्या वर्षी बुचीला गणपतीच्या जलशात गाण्याचा आदेश होतो. चारतास ती गाते. तेव्हा बीनवादक अली हुसेनखाँ म्हणतो, ''ही मुलगी स्वयंभू देवदत्त वारसा घेऊन जन्माला आलीय. पण हा दैवी आवाज पृथ्वीवर फार काळ राहणार नाही. त्याची जागा वर आहे.'' आणि प्लेगच्या साथीत खरोखर बुची बळी पडते. तिचे वडील नारायणराव व छोटाबाबू यांनाही मृत्यू येतो. नबूबाई हादरते. हिरा अंजनीला म्हणते, ''तुला मोठी गायिका बनवायचं स्वप्न बाबा बघत होते... ते स्वप्न तू पूर्ण कर. गाण्यात मन लाव. मेहनत कर. नाव मिळव.'' प्लेगमुळे नजिरखाँ हैद्राबादला जातात. वर्षाने मुंबईला परत येतात. प्लेगमध्ये त्यांच्या मुलालाही मृत्यू आलेला असतो. नजिरखाँ म्हणतात, ''एक कलावंत म्हणून जवळची कला वारसाला द्यावी ही इच्छा मुबारकच्या मृत्यूनं उधळून लावली. जगायची इच्छाच संपली.'' पण अंजनीचं गाणं ते ऐकतात आणि म्हणतात, ''नाही. मला जगावंच लागणार. अंजनीचं गाणं ऐकून मला धीर आलाय.'' पुढचा सराव सुरू होतो. नजिरखाँची मुलगी भोलिया अंजनीची मैत्रीण बनते. भोलिया तिला अनेक राग आळवून दाखवते. ती खानदानी मुस्लिम. बैठकीचं गाणं तिला वर्ज्य. नाहीतर भेंडीबाजार गायकीचा वारसा तिच्याकडेच आला असता.

त्या वेळच्या मुंबईतल्या मशहूर गायिकांच्या जलशांना नजिरखाँ अंजनीला नेत. त्यातून उत्कृष्ट ते तिनं घ्यावं ही त्यांची इच्छा. गोहरजानच्या ठुमरी ऐकून अंजनी थक्क होते. 'विजेनं

थरथरत खाली उतरावं तशी तानांची बरसात...' गोहरजान अंजनीला ठुमरी, कजरी, कव्वाली, गजल, दादरा वगैरेचे धडे देऊ लागतात. गुल्लू खानांच्या द्रुत गतीच्या तानांचाही अंजनी अभ्यास करते. पं. भातखंडे म्हणतात, ''ही पोरगी म्हणजे अदुत रसायन आहे. तुमचा सारा आत्मा तिच्यात उतरला आहे. या मुलीसमोर कोणीही बुजुर्ग गायक टिकाव धरू शकणार नाही.'' ते तिला वैष्णव संप्रदायाच्या जीवनलाल व गोकुळदास महाराजांकडे घेऊन जातात. अंजनीला बघून जीवनलाल म्हणतात, ''बेटी, तू मेरी बेटी है. ये तो जनमजनमका रिश्ता है.''

शेठ त्रिभुवनदास मंगलदास यांच्या घरी अंजनीचा पहिला जलसा होतो. दहा वर्षांच्या तिच्या संगीतसाधनेचा चमत्कार सर्वांना कळतो. तिच्या घोटीव दळदार स्वच्छ सुरांचा लडिवाळपणा रसिकांना जिंकून घेतो. नजिरखाँना भावनावेग आवरणं कठिण होतं...

अंजनीला अनेक आमंत्रणं येऊ लागतात. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या दर्शनाची आजीची इच्छा– म्हणून पहिली बैठक ती कोल्हापूरची ठरवते. कोल्हापूरचे कलासक्त छत्रपती म्हणतात, ''फार सुख झालं बाई तुमचं गाणं ऐकून. आजधरनं तुमी आमच्या पावन्या. आमची धर्माची भन म्हणा! तुमचा सन्मान दरबारात व्हायला हवा.'' ते तिला हिऱ्यांचा लफ्फा आणि सोन्याची फुलं बसवलेला तंबोरा भेट देतात.

नंतर आमंत्रण येते काशीहून जीवनलाल महाराजांचे. ते तेथील वल्लभ संप्रदायाचे पीठाधीश. गंगेतल्या नौकेवर अंजनीची बैठक होते. गंगेच्या पात्रातून स्वरदेवताच अवतरल्याचा भास सर्वांना होतो. मीरेची आर्त भक्ती सर्वांना भारावून टाकते... मथुरा, पशुपती– आमंत्रणेच आमंत्रणे!

मुंबईला परतल्यावर अंजनीला हिरा-सुरंगा भेटतात. सुरंगाची चित्रे राजा रविवर्मा काढत असतात; सीता, उर्वशी, पार्वती, शकुंतला या त्यांच्या चित्रात सुरंगाच प्रकट होत असते. हिरा हीही कलावंतीण. तिच्या घरी कोल्हटकर, वरेरकर वगैरे मोठे नाटककार लेखक येतात. साहित्यचर्चा करतात. तिच्यावर प्रेम करणारे नाना जोगळेकर हे अकाली गेल्याने हिरा व्यसनात गुरफटते असे तिला कळते. दामिनी हे नाटक तिने लिहिलेले असते.

गोमंतकात अंजनीचा कार्यक्रम होतो. मालप्याच्या घरी मूळदेवाची पूजा बांधून मूळवीराच्या मंदिरात सेवा म्हणून अंजनी गाते. देसायांच्या हवेलीत जाते. तरुण संपन्न गायिका म्हणून तिचा वावर सर्वांना सुखद वाटतो. गोव्याचा तरणाबांड गव्हर्नर तिचे गाणे ऐकायला येतो, तेव्हा तिला लपवून मुंबईला पाठवण्यात येते.

कापड, गिरण्या, जवाहिरांची पेढी असणाऱ्या वसनजीला अंजनी पसंत पडते. एका शुभमुहूर्तावर दोघांचे लग्न होते. वसनजीची पहिली बायको असते. तिच्यापासून होणाऱ्या मुलांना वसनजी वेद हे नाव लावण्याची अट त्याने मान्य केलेली असते. ''तू केवळ गायिका व लावण्यवती म्हणून मला प्रिय नाहीस. तू एक बुद्धिवान चारित्र्यवान स्त्री आहेस. या आपल्या छोट्या घरात तू आनंदानं राहा, तुझं गाणं फुलव.''

लग्नानंतर काही विशिष्ट आमंत्रणंच अंजनी घेते. होळकर महाराजांनी मुंबईतच तिचं गाणं ठरवून राजेमहाराजांना निमंत्रित केले. उत्तम बिदागी दिली. जयपूर नरेशांनी मीनाकाम केलेल्या पदकाचा मोत्यांचा हार दिला.



शेठ लक्ष्मीचंदाच्या घरच्या लग्नाच्या वेळी अंजनीची राजा रविवर्मा यांच्याशी ओळख होते.

मुंबईतील म्युझिकल सर्कल संस्थेचे सभासद धनाढ्य असत. सर्वसामान्यांना तेथे स्थान नसे. म्हणून अंजनीबाईंच्या मदतीने नामदेव मांजरेकर एक नवी संस्था काढून तिच्यातर्फे अनेक कार्यक्रम करतात.

राजा रविवर्मा यांनी शिळा प्रेस काढून देवतांची चित्रे छापली; नाक्यानाक्यावर ती चित्रे दिसू लागली. आपल्या देवतांना नागडेउघडे केले, म्हणून त्यांजवर खटला भरण्यात येतो.

अंजनीबाईंचा आवाज अचानक जातो. साधं बोलणंही अवघड होतं. पण नारायणमहाराजांचा प्रसाद ग्रहण केल्यावर पुन्हा आवाज येतो. त्यांच्या भेटीसाठी त्या केडगावला जातात. भजने म्हणतात. ''भाग मोरे जागे तेरा दरशन पायो... जीवन सफल भयो.''

राजा रविवर्मा यांजवरील खटल्यात त्यांना शिक्षा होईल आणि या शिक्षेला आपण कारण आहोत या कल्पनेने सुरंगा विषप्राशन करते. राजा रविवर्मा यांची निर्दोष सुटका होते, ते सुरंगाकडे जातात; पण त्या आधीच तिचे देहावसान झालेले असते.

अंजनीबाई रविवर्म्यांना भेटते; त्यांच्यापुढे गाते. सांत्वन करते.

त्याच सुमाराला नजिरखाँची तब्येत ढासळते.

वसनजीला धंद्यात मोठी खोट बसते. तो दिवाळखोर ठरतो.

अंजनी आपलं जडजवाहिर– घर विकून वसनजीचं कर्ज फेडते. पण त्यानंतर चार दिवसांनीच वसनजीचा देहान्त होतो.

अंजनी पुन्हा आईकडे नवीवाडीत रहायला येते. अंजनीला एकटे एकटे वाटते.

तिचा आवाज तिला सोडून जातो. ती गाणे बंद करते.

एकदा बेगम अख्तर तिला भेटायला येते. ती विचारते, ''माईजी, मुझे आश्चर्य इस बातका होता है की गाना तो आपने भी छोडा है, लेकिन गानेसे बिछडनेके बाद भी आप वैसीही है, प्रसन्न तृप्त. ये सिद्धी आपने कैसी प्राप्त की?''


अंजनीबाई उत्तर देते, ''वेडी पोर! अगं गाणं कधी सोडता येईल का? तो तर आपला प्राण आहे. सोडतो म्हटलं तरी सुटेल? लहान आहेस बेटी! समजेल पुढे कधी.''

बेगमचं गाणं कानावर पडताना तिला हिमालयातलं कांचनगंगा शिखर दिसत होतं. त्या शिखरावर ध्यानस्थ झालेला वालुकेश्वर दिसत होता. तेच तर होतं अंतिम पर्व!

**पृष्ठे** २१० **किंमत** : १५०रु. **सवलतीत** : १२८रु. **सभासदांना** : ११३रु. **पोस्टेज** :२०रु.


## *माधवी देसाई यांची इतर पुस्तके*

**कादंबरी**- **नियती**- ६०रु. **कथासंग्रह**- **कथा सावलीची**- ७०रु.
**प्रार्थना**- १२५रु. **सागर**- ६०रु.
**परिचय** (अमृता प्रीतम) अनुवादित- ८०रु.




# द कंपनी ऑफ विमेन

**खुशवंतसिंग**

## स्त्रीसुखाची विविधता चाखू पाहणाऱ्या पुरुषाची चंचलगाथा

एक बिनधास्त लेखक आणि पत्रकार म्हणून, सेक्स-स्कॉच-स्कॉलरशिप शौकीन म्हणून फुशारकी मिरवणारे खुशवंतसिंग यांचे नाव आता मराठी वाचकांच्या चांगले परिचयाचे आहे. वुइथ मॅलिस टोअर्डस ऑल हे त्यांचे खुसखुशीत सदर अनेक इंग्लिश वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होते, आणि त्यातून त्यांना घसघशीत प्राप्ती होते. 'ए ट्रेन टू पाकिस्तान' ही त्यांची फाळणीच्या ससेहोलपटीचे विदारक चित्रण करणारी कादंबरी एकेकाळी गाजली. माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष हे त्यांचे पुस्तकही मराठीत आलेले आहे. इलस्ट्रेटेड वीकलीचे संपादक म्हणून त्यांनी मोठीच कामगिरी बजावली.आणीबाणीच्या काळात ते संजय गांधी यांच्याजवळ होते, आणि मेनका गांधींना मनेका बनवण्यात त्यांचाच पुढाकार होता. त्यानंतर मात्र इंदिरा गांधींनी त्यांना चार हात दूर ठेवले. तरीही पेंग्विन प्रकाशनसाठी त्यांनी जोक्सचे अनेक संग्रह तयार केले. शिखांचा इतिहास लिहिला.वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी द कंपनी ऑफ विमेन ही कादंबरी लिहून अनेकांना हादरा दिला.

या कादंबरीचा नायक मोहन हा एक कामपिसाट उद्योगपती दाखवला आहे. विविध जातीधर्माच्या आणि वयाच्या स्त्रियांमध्ये त्याला रस आहे आणि त्यांना जिंकण्याची कला त्याला अवगत आहे. त्यामुळे नावाप्रमाणेच या कादंबरीत त्याच्या जीवनात एका पाठोपाठ एक अशा ज्या स्त्रिया आल्या, त्यांच्या लीलांची मालिकाच उभी करण्यात आली आहे. स्वत: खुशवंतसिंग यांनी 'ऐंशीच्या पुढच्या पुरुषाचा कल्पनाविलास' हे नावही या कादंबरीला शोभून दिसेल असे म्हटले आहे. या कादंबरीतील पात्रे ही आपल्या वार्धक्यातील मनोविलासातून निर्माण झालेली आहेत, ती सत्यसृष्टीतील नाहीत असा खुलासाही केला आहे. ''पुरुष जसजसा वयस्कर होत जातो तसतसे त्याच्या नैसर्गिक कामभावनेचे केंद्र देहाच्या मध्याकडून वर मस्तकाकडे सरकत जाते. तरुण वयात अतृप्त राहिलेल्या कामक्रीडांचा अनुभव कल्पनाविलासाद्वारे घेण्यात तो स्वत:ला झोकून देतो.'' असे मध्यवर्ती सूत्र ते या तथाकथित कामनापूर्तीचे मानसशास्त्रीय अधिष्ठान म्हणून प्रकट करतात. खरे खोटे त्यांना माहीत; परंतु



खुशवंत सिंग यानी प्रच्छन्नपणे स्वत:च्याच या क्षेत्रातील पराक्रमाची नोंद या कांदबरीत केली असावी असे अनेकांना वाटते. बरेच तपशील त्यांच्या इतर आत्मपर लेखनातील तपशीलांशी मिळतेजुळते आहेत. तेच उद्योगपती मोहनच्या नावावर खपवून स्वत: नामानिराळे राहण्याचा त्यांचा सावधगिरीचा पवित्रा असावा. अर्थात कुठल्याही लेखकाचा तो हक्कच असतो. त्यामुळे तक्रारीचे कारण नाही. प्रत्येक कादंबरी ही एका परीने आत्मकथाच असते.

या कादंबरीचे तीन भाग आहेत. मोहन कुमारचे गुप्त खाजगी जीवन (पृष्ठ १ ते ८०), मोहन कुमारचे आत्मनिवेदन (८१-२७३), मोहनकुमारचे अखेरचे दिवस (२७५-२९३). यातील आत्मनिवेदनाचा मधला भाग हा प्रथमपुरुषी आहे. आरंभीचा वा अखेरचा भाग तृतीय पुरुषी निवेदकाचा आहे. मोहनकुमारला त्याच्या पत्नीने घटस्फोट देऊन, दोन मुलांचा ताबा घेऊन माहेरकडे प्रयाण केले; आणि मोहनकुमारला पदोपदी पाणउतारा करणाऱ्या तापट स्वभावाच्या बायकोच्या जाचातून सुटका झाल्यासारखे वाटते,तसेच हृदयात पोकळी निर्माण झाल्यासारखेही वाटते येथून या कादंबरीचा प्रारंभ होतो. बारा वर्षांचे हे सहजीवन संपुष्टात आल्यावर त्याला आपल्या वैवाहिक जीवनाचे आरंभीचे दिवस आठवतात. मध्यमवर्गीय आकांक्षा असणारा मोहन कुमार अमेरिकेहून संगणकतज्ज्ञ व बिझिनेस मॅनेजमेंटचा पदवीधर होऊन तेरा वर्षांपूर्वी भारतात परततो. त्याचे वडील सेवानिवृत्त शासकीय अधिकारी. राय बहादूर लाला अचिन्त्यराम यांची कन्या सोनू हिच्याशी त्याचे लग्न होते. कॉन्व्हेंट शिक्षित, तडफदार व बऱ्यापैकी रूपवान अशी सोनू 'आपला कौमार्यभंग होण्यास उत्सुक झालेली' कुमारी होती. भरपूर हुंडा, भपकेबाज लग्न आणि सासऱ्याने घेऊन दिलेला सुसज्ज फ्लॅट. मधुचंद्रही अधाशासारखा. एकमेकांच्या शरीराची ओळख करून घेण्यात एवढेच नव्हे तर पहिल्या मुलाची चाहूल देणाराही ठरला. परंतु श्रीमंत बापाची कन्या सोनू चिडखोर, स्वच्छंद, बडेजाव मिरवणारी, वर्चस्व गाजवणारी, मत्सरी आणि स्वतंत्र बाण्याची होती. सासूसासऱ्यांचाही जाच तिला नको होता. ''मी तुमच्याशी लग्न केलंय.सासूसासऱ्यांशी नाही'' असे ती बजावते.

रेडीमेड कपडे, जडजवाहर आणि चर्मवस्तू निर्यातीचा व्यवसाय मोहनकुमार सुरू करतो आणि स्वत: नवा बंगला खरेदी करतो. त्याचे आई-वडील घर सोडून हरिद्वारला जातात. सोनूला आता खरे मोकळे वाटते. पण आपली बायको खुनशी स्वभावाची असून तिच्यापासून आपल्याला कधीही सुख लाभणार नाही हे आरंभीच मोहन कुमारला स्पष्ट कळून चुकते आणि दोघांची रोजच भांडणे होऊ लागली. शारीरिक गरजेमुळे शरीरसंबंध होत राहिला पण त्यातले काव्य संपले. मोहनकुमारवर बदफैलीपणाचा आरोप तिने केला तेव्हा त्याने तिच्या फाडकन तोंडात मारले; तेव्हा ती म्हणाली, ''तू माझ्यावर हात टाकण्याचे धाडस केलंस. तुला आता असा धडा शिकवते की तो तू कधीच विसरणार नाहीस.'' आणि ती चक्क पोलिस इन्स्पेक्टरला घेऊन येते. पाच हजार रुपये देऊन इन्स्पेक्टर घरेलू मामला, अदखलपात्र गुन्हा म्हणून त्याला सोडतो; सोनू माहेरी जाते, ती महिन्याने येते.

या घटनेने तो इतर स्त्रियांचा विचार करू लागतो. लग्नाआधीच्या मैत्रिणींचा शोध घेतो. त्याच्या बऱ्याच मैत्रिणी अमेरिकन व युरोपियन होत्या. खुशीचा मामला होता. ते दिवस सोनेरी होते. त्याच वेळी मोहन आपल्या जीवनाचे एक नवे तत्त्वज्ञान ठरवतो. विवाह ही गोष्ट स्वर्गात ठरवली जात नाही; ती माणसांकडूनच या भूतलावर व्यावहारिक हेतूंसाठी ठरवली जाते. या व्यवहारात पैशालाच अग्रक्रम असतो. आर्थिक सुरक्षितता वा आमिष हीच गोष्ट प्रभावी असते. लग्नानंतरचे काही दिवस एकमेकांच्या आत्मीयतेने भारलेले असतात. कालच्या वधूला आपण

माता होणार हे कळले की तिचा उत्स्फूर्त कामभावनेचा बहर ओसरतो. कामसुखाला 'रूटिन' महत्त्व उरते. त्यातील चार्म कमी होतो. पती-पत्नीतील प्रतिसाद थंड होऊ लागला की बाह्यसंबंधांचीही ओढ वाढते. विवाहबाह्य संबंधामुळेही अनेकांचे संसार वरकरणी सुखाने चालतात. ते संबंध म्हणजे पापकर्म आहे असा समज मूर्खपणाचाच आहे– हे मोहन कुमारला ठामपणे पटते.

मोहन कुमार वृत्तपत्रात एक जाहिरात देतो.

''पत्नी व दोन मुले यांपासून वेगळे राहून घटस्फोटाच्या प्रतीक्षेत असलेल्या अमेरिका रिटर्न्ड चाळिशीतल्या, उद्योगपतीला एक मैत्रिणीची गरज आहे. महिना १० हजार रुपये. धर्माची अट नाही. इच्छुकांनी फोटोसह अर्ज करावे.''

कामवासना उफाळून आल्यावर प्रत्येक स्त्रीकडे त्याच भावनेने त्याची नजर वळू लागते. बंगल्यातील धन्नो ही मोलकरीणही त्याला आकर्षक वाटते. त्याच्या नजरेतला भाव ती ओळखते; आणि तीही त्याच्यावर आपले मायाजाल पसरते. उत्साहाने प्रतिसाद देते. 'तिसऱ्या बच्च्यानंतर मी नसबंदी करून घेतलीय. निरोधची जरूर नाही, त्याशिवायही मजा येईल' असेही सुचवते... कळसबिंदूपाशी पोचल्यावर ती अधिकच पिसाट होते. आपली नखे त्याच्या मांसात रुतवते. त्याचे ओठ करकचून चावते... मोहनला आपल्या पौरुषाचा अभिमान वाटतो. तो तिला दोन नोटा देतो तेव्हा ती म्हणते, ''याची काय गरज होती?... मी तुमची दासी आहे... हवं तेव्हा हजर होईन.''

त्याच्या जाहिरातीलाही उत्तरे येतात. त्यातील सरोजिनीचे पत्र त्याला स्वीकारार्ह वाटते. घटस्फोटित, अकरा वर्षाचा मुलगा, प्राध्यापिका अशी सरोजिनी दोन महिन्यांची रजा काढून कंपॅनियन व्हायची तयारी दाखवते. फोटोही पाठवते. त्याने होकार कळवताच ती येते. 'तिचे ओठ त्याची कामभावना चाळवणारे असतात. सौंदर्य बेताचे पण उठावदार. मात्र ती सांगते, ''मुलं ही लग्नाच्या बंधनातूनच जन्मायला हवीत. तात्पुरत्या संबंधातून नव्हे.''... आणि ती एके दिवशी त्या घरात राहायला येते. त्याला टॉप ऑफ द वर्ल्ड असल्यासारखं वाटतं तर तिला स्वर्गात पोचल्यासारखं वाटतं... धन्नो तिच्याकडे प्रतिस्पर्धी म्हणून बघते. आपल्याकडे जे जे आहे, ते सारे या बाईकडे आहे. पण आपल्यापेक्षा ते लहान आहे असे धन्नोला वाटते. पुरुषांची जातच हलकट. एकीचा कंटाळा आला की चालले दुसरीला शोधायला.'' ही तिची प्रतिक्रिया.

–मोहन कुमारच्या आत्मनिवेदनातून त्याच्या जीवनात आलेल्या जेसिका ब्राऊन, यास्मिन, मेरी जोसेफ, मॉली गोम्स, सुशांतिका यांची ओळख होते.

मोहनकुमारचे शेवटचे दिवस मात्र वाईट जातात. एका दुर्धर रोगाची लागण झाल्याने तो झोपेच्या गोळ्या खाऊन आपल्या आयुष्यात पूर्णविराम देतो.

खुशवंतसिंग यांच्या या कादंबरीतून अनेक स्त्रियांचा मनमुराद सहवास लुटणाऱ्या एका पुरुषाची वैविध्याची चटक समोर येते. त्या स्त्रियांच्या मानसिकतेची आणि त्याच्या 'महान' पौरुषाची कल्पना येते. शेवटी एचआयव्ही पॉझिटिव्ह असे निदान झाल्यामुळे या सर्व कामलीलांचा शेवट हा अशा स्वैराचारातून ओढवणाऱ्या भयानक अनर्थाकडेच लक्ष वेधतो.

या कादंबरीत सेक्सची वर्णने खूपदा आली आहेत. मूळ इंग्रजीत ती वाचताना फारसे वेगळे जाणवत नाही. मराठीत ती वर्णने आणणे एकूण अवघडच! पण अनुवादकाने मोठ्या चलाखपणे हे काम पार पाडले आहे. ते तारीफे काबिल आहे.

**पृष्ठे** ३०२ **किंमत** : २००रु. **सवलतीत** : १७०रु. **सभासदांना** : १५०रु. **पोस्टेज** :२०रु.



# माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथ व ग्रंथालयांवर परिणाम

**डॉ. एस. पी. सातारकर, जे. एन. कुलकर्णी**

माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथ व ग्रंथालयाचे स्वरूप निश्चितच बदलणार आहे. परंतु माहिती तंत्रज्ञान कागदविरहित समाज निर्माण करेल, ग्रंथालये नामशेष होतील असे म्हणणेही सयुक्तिक ठरणार नाही. माहिती तंत्रज्ञानाचा वास्तववादी वापर ग्रंथालयाच्या पर्यायाने समाजाच्या हितासाठी केला पाहिजे. तेव्हा माहिती तंत्रज्ञानाचे आक्रमण किंवा वरदान न म्हणता माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथ व ग्रंथालयावर होणारा परिणाम वास्तववादी दृष्टिकोनातून या लेखात मांडला आहे.

माहिती तंत्रज्ञानाचे वरदान आज जगाला लाभलेले आहे. जग माहिती तंत्रज्ञानाच्या कल्पवृक्षाखाली उभं आहे. हा कल्पवृक्ष मागेल ते देणारा आहे पण मागताना विचार करून मागायला शिकावे लागणार आहे. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथ व ग्रंथालयावर निश्चितच परिणाम होणार आहे. ग्रंथालयांसाठी हे वरदान आहे. पण स्वप्नवत काहीही घडणार नाही. जादूची कांडी फिरविली आणि ग्रंथ व ग्रंथालये अचानक बदलली असे काहीही होणार नाही. परंतु नेमकं काय होईल याचा दोन्हीही बाजूने सविस्तर विचार करून भविष्याची दिशा ठरविणे गरजेचे आहे.

## ग्रंथ आणि ग्रंथालय

जेणे होय उपरती। आवगून पालटती।।
जेणे चूक अधोगती। त्या नाव ग्रंथ।।

ग्रंथाची अशी व्याख्या महाराष्ट्रातील संतकवी समर्थ रामदासांनी केली आहे. मनुष्यातील चांगला बदल, अवगुणांचे निर्मूलन आणि अधोगतीपासून दूर नेण्याचे काम ग्रंथ करीत असतात. परंतु माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात या ग्रंथाची जागा अन्य साधने घेतात की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. तसेच, माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयांच्या स्वरूपात निश्चितच काही बदल जाणवेल, परंतु ग्रंथालयाचे स्वरूप पूर्णपणे बदलेल, ग्रंथालयाचे अस्तित्वच राहणार नाही, अशा प्रकारची चर्चा आज होताना दिसत आहे.

## माहिती तंत्रज्ञान

संगणक, इंटरनेट म्हणजेच माहिती तंत्रज्ञान असं काहीसं चित्र निर्माण होताना दिसत आहे. परंतु इंटरनेट किंवा संगणक हे माहिती तंत्रज्ञानाचे एक-एक भाग आहेत. माहिती तंत्रज्ञानात संगणकाबरोबरच, झेरॉक्स, दूरध्वनी, फॅक्स, इ मेल इत्यादी सेवांचा तंत्रज्ञानाचा उपयोग जनहितासाठी करून घ्यायचा आहे. उपलब्ध साधनसामग्रीचा वापर वाढविणे, संदेशहवनाचा

वेग वाढणे इत्यादी फायदे या तंत्रज्ञानामुळे शक्य होणार असले तरी सर्व चित्रच बदलेल, अचानक बदल संभवू लागतील की काय अशी भीती सर्वांना वाटत आहे.

### माहिती तंत्रज्ञानाचे फायदे

१. माहिती प्रकरणात किंवा संदेशवहनातील वेळ कमी झाला.

२. माहिती प्रसारणाची अचूकता वाढली.

३. माहितीसंचय हा कमीत कमी जागेत करणे शक्य झाले.

### ग्रंथ प्रकाशनावर परिणाम

माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथमुद्रण अधिक सुस्पष्ट व आकर्षक करणे सोपे झाले आहे. प्रकाशनासाठी लागणारा कालावधी कमी झाला आहे. त्याचबरोबर झेरॉक्स व तत्सम तंत्रज्ञानामुळे ग्रंथ प्रकाशनाच्या प्रतीच्या संख्येत घट निर्माण होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. याउलट माहिती तंत्रज्ञानामुळे कमीत कमी वेळात ग्रंथ प्रकाशित करून तो ग्रंथ अधिकाधिक वाचकाकडे पोहोचविणे शक्य झाले आहे.

माहिती तंत्रज्ञानामुळे प्रकाशनाची जाहिरात अधिकाधिक लोकापर्यंत पोहोचत आहे. एकंदरीत फायदे आणि तोटे दोन्हीही आहेत. मात्र, इलेक्ट्रॉनिक प्रकाशनाचा परिणाम मुद्रित प्रकाशन व्यवसायावर होण्याची दाट शक्यता आहे असे वाटत असले तरी त्या प्रकाशनाची अत्यधिक किंमत, वाचनासाठी असलेल्या मर्यादा, अनेक साधनांची आवश्यकता उदा. विद्युत पुरवठा, संगणक इत्यादी बाबीमुळे इलेक्ट्रॉनिक प्रकाशनाचा प्रसार सर्वदूर पोहोणे अवघड आहे. माहिती तंत्रज्ञानाचे काहीसे दुष्परिणाम ग्रंथ प्रकाशनावर होतील, असे वाटत असले तरी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर प्रकाशन व्यवसायास अनुकूलच ठरणार आहे.

### ग्रंथालयांवर परिणाम

ग्रंथ संकलन, प्रक्रिया, संग्रह व वितरण ही कार्यप्रणाली बदलून माहिती संकलन, प्रक्रिया, संचय व वितरण ही ग्रंथप्रणाली ग्रंथालयाच्या बाबतीत पुढे येत आहे. ज्ञानप्रसार हे ग्रंथालयाचे ध्येय आहे आणि त्यासाठीची माहिती किंवा ज्ञान केवळ मुद्रित ग्रंथांतूनच मिळविणे आवश्यक नाही. साध्य महत्त्वाचे, साधन नाही. माहिती तंत्रज्ञानाचे दूरगामी परिणाम ग्रंथालय विश्वावर होणार आहेत. यात संशय नाही. नवीन तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर ग्रंथालयात होणे आवश्यक आहे.

त्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांनाही स्वत:च्या ज्ञानकक्षा रुंद कराव्या लागतील. तंत्रज्ञानाचा चांगला वापर करून चांगली ग्रंथालयीन सेवा द्यावी लागेल. तंत्रज्ञानामुळे स्पर्धा वाढणार आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर ग्रंथालयांनी करावयास हवा. त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथालये बंद पडतील ग्रंथालयाकडे कोणीही फिरकणार नाही किंवा ग्रंथालयाचे अस्तित्वच राहणार नाही. मुद्रित प्रकाशने पूर्णपणे बंद पडतील. कागदाचा वापर पूर्णपणे बंद होऊन कागदविरहित जीवन निर्माण होईल इत्यादी बाबींची भीती व असं



होणारच अशा प्रकारच्या माहिती तंत्रज्ञानप्रेमीची वक्तव्ये मात्र पूर्णपणे खरी ठरणार नाहीत. मुद्रित ग्रंथही राहतील आणि ग्रंथालयेही, कारण ग्रंथालय ही सामाजिक संस्था आहे. शुद्ध शास्त्र आणि सामाजिक शास्त्रातील महत्त्वाचा फरक असा आहे की, शुद्धशास्त्रातील एखादा सिद्धांत सूत्रबद्ध करता येतो. सामाजिक शास्त्रात तसे नाही.

दूरदर्शनमुळे वर्तमानपत्रे बंद पडतील, अशी कल्पना दूरदर्शनच्या सुरुवातीच्या काळात मांडली जात होती. परंतु आजही वर्तमानपत्रे टिकून आहेत व राहतील. त्याचप्रमाणे इंटरनेटच्या भरपूर प्रसारानंतरही ग्रंथ व ग्रंथालये राहतीलच.

(लेखकद्वय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, येथे ग्रंथपाल व सहाय्यक ग्रंथपाल आहेत.)

## शब्दकोडे

रचनाकार - **मनोहर बांदेकर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | मे | ल | ना | ध्य | क्षा | त | डॉ |
| मे | अ | क | ल्पि | त | क | ळया | वि |
| ल | व | खे | क | मा | न | म | ज |
| ना | ती | ही | र | का | हुं | त | या |
| ध्य | भ | दे | फा | चे | टि | ळया | रा |
| क्ष | व | वि | त्र | बें | प | त | जा |
| डॉ | ती | र्ध | रा | त्त | उ | र्व | ध्य |
| वि | ज | या | रा | जा | ध्य | क्ष | क्ष |

शेजारील चौकोनात ९ पुस्तकांची नावे दडलेली आहेत. ती नावे व त्यातील ललितलेख व कथासंग्रह कोणते आहेत, ते ओळखा व बक्षीस मिळवा. बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत - १६ मार्च २०००**

आमचा पत्ता - **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १२१६ सदाशिव पेठ, पुणे- ३०

# १९९९ सालातील प्रकाशित पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| काशभट | मंगेश पदकी | ७० /- |
| प्रवाहातील तारू | सु. वि. सुंठणकर | १२५/- |
| द प्रॉडगल सन | अनु. मंगला निगुडकर | २००/- |
| नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| द फोर्थ के | अनु. वनिता सावंत | २००/- |
| अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| ऑपरेशन गुलमोहर | अनु. शरयु पेडणेकर | १५०/- |
| मंदिरा | अनु. तारा पंडित | १२५/- |
| काँगो | अनु. अरुण मांडे | १६०/- |
| **कथासंग्रह** | | |
| आत्मवेध | निरंजन घाटे | १२०/- |
| खिडकीलाही डोळे असतात | डॉ. बाळ फोंडके | ११०/- |
| विज्ञान विशेष | डॉ. बाळ फोंडके | ११०/- |
| सावित्रीचा निर्णय | नागनाथ कोत्तापल्ले | १००/- |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | ११०/- |
| प्रवाह | पांडुरंग कुंभार | ८०/- |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १२५/- |
| निसटलेले | आशा बगे | १००/- |
| ऋतुवेगळे | आशा बगे | ६०/- |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५/- |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८०/- |
| झुंज कॅन्सरशी | द. कृ. गोसावी | ६०/- |
| शेष अवशेष | अरविंद रे | १२५/- |
| **ललितगद्य** | | |
| जागल्या | दया पवार | ५०/- |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२०/- |
| रंगरेषा | शान्ता ज. शेळके | ७५/- |
| मद्य नव्हे हे मंतरलेले पाणी | संपा. अरुण शेवते | १२०/- |



| | | |
|---|---|---|
| **वैचारिक साहित्य** | | |
| ध्यानसूत्र : ओशो | अनु. माधव कर्वे | १००/- |
| मी धार्मिकता शिकवितो धर्म नाही : ओशो | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| **राजकीय विषयावरील पुस्तके** | | |
| द वर्ल्ड ऑफ फतवा | अनु. भारती पांडे | ३००/- |
| **प्रवासवर्णन** | | |
| एकला चलो रे | दया पवार | ५०/- |
| **आरोग्यविषयक** | | |
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५०/- |
| भारतवैद्यक | डॉ. शाम अष्टेकर | ६००/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| तुम्ही आणि तुमचं वैवाहिक जीवन | अनु. प्रमोद संभूस | ७०/- |
| निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ४०/- |
| **क्रीडाविषयक** | | |
| क्रीडाज्ञानकोश | सुरेशचंद्र नाडकर्णी | ६००/- |
| **विज्ञानविषयक** | | |
| पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं | डॉ. सरिता पटवर्धन | ६०/- |
| नवचैतन्याचा झरा | अनु. प्रमोद जोगळेकर | ६५/- |
| **काव्य** | | |
| वि. स. खांडेकरांची कविता | संपा. अविनाश आवलगावकर | १३०/- |
| किनारे मनाचे : शान्ता शेळके | संपा. प्रभा गणोरकर | १००/- |
| **संदर्भ ग्रंथ** | | |
| मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा | प्रा. रमेश तेंडुलकर | १३०/- |
| मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास | कैलैस सार्वेकर | २००/- |
| **चरित्रे / व्यक्तिचरित्रे** | | |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- |
| महात्मा (जोतीराव फुले) | डॉ. रविंद्र ठाकूर | ३००/- |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |

## नाटके

| | | |
|---|---|---|
| नको स्वातंत्र्य स्त्रीला | दिलीप परदेशी | ५०/- |
| दिवस फार चांगले आहेत | विद्याधर पुंडलिक | ४०/- |
| श्रद्धा | विद्याधर पुंडलिक | ५०/- |
| कुणीकडून कुणीकडे | विद्याधर पुंडलिक | ४०/- |
| भैरवी | दिलीप परदेशी | ५०/- |

## संदर्भ

| | | |
|---|---|---|
| मराठी ग्रामीण साहित्य परिसर आणि प्रवाह | गो. म. कुलकर्णी | ४०/- |

## भूगोल

| | | |
|---|---|---|
| प्राकृतिक भूगोल | के. ए. खतीब | ७०/- |
| भारताचा भूगोल | के. ए. खतीब | १३०/- |



# २००० सालातील आमची नवीन प्रकाशने

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| सुंदरबनच्या जंगलात | अनु. तारा पंडित | ६०/- |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५०/- |
| द फिस्ट ऑफ गॉड | अनु. अनिल काळे | ३००/- |
| ज्युरॅसिक पार्क | अनु. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| क्रोमोझोम - ६ | वैशाली जोशी | ३५०/- |
| प्रार्थना | माधवी देसाई | १२५/- |
| गाजव्यथा | एम् .डी. लहानकर | १००/- |
| वेगळ्या वाटा | पांडुरंग कुंभार | ७०/- |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५०/- |
| **कथासंग्रह** | | |
| मुंबई...मुंबई | अनु. नारायण आवटी | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| कातरवेळ | एम. डी. लहानकर | ७०/- |
| पोस्टमार्टेम | प. बा. सामंत | १२५/- |
| गुंता सोडविताना | अनुराधा गुरव | ११०/- |
| द्वंद्व | अनु. वनिता सावंत | १५०/- |
| इस्कोट | उत्तम बावस्कर | ७०/- |
| नक्षत्रांच्या प्रकाशात | विजया जहागिरदार | १००/- |
| **ललित** | | |
| रानातील प्रकाश | विजय पाडळकर | ६०/- |
| आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे | २००/- |
| हितगुज | अनु. वृंदा दाभोळकर | १६०/- |
| सिलेक्टिव्ह मेमरी | अनु. अपर्णा वेलणकर | ३३०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १००/- |
| स्मरण विस्मरण | नामदेर कांबळे | १२५/- |
| उद्याच्या सुंदर दिवसांसाठी | नागनाथ कोत्तापल्ले | १००/- |
| चिंतनाच्या वाटा | निर्मलकुमार फडकुले | ९०/- |
| **शब्दकोश** | | |
| पर्याय शब्दकोश | वि. श. ठकार | ३००/- |

## संकीर्ण

| | | |
|---|---|---|
| ड्रिंक्स व कॉकटेल्स | डॉ. जयंत नरवणे | १२५/- |
| आय सी ८१४ अपहरणाचे १७३ तास | अनु. लीना सोहोनी | १२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| ज्ञानदा निबंधमाला | दिपाली पोरे-वेल्हाळ | ११०/- |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु. मीना टाकळकर | १००/- |
| सुखद मातृत्व | रत्नावली दातार | ५०/- |
| घरातील बाग | आ. बा. पाटील | १००/- |
| स्वभावाला औषध आहे | डॉ. रमा मराठे | १००/- |
| उत्तम स्मृतीचा कानमंत्र | चारुलता पाटील | ५०/- |
| मुलांच्या समृद्ध जीवनासाठी | सुचित तांबोळी | १००/- |
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस. इटोकर | ६०/- |
| करोडोंचे सामान्यज्ञान | सुनीता दांडेकर | ८०/- |

## वैचारिक

| | | |
|---|---|---|
| ग्रामसंस्कृती | आनंद यादव | १२५/- |

## संदर्भ

| | | |
|---|---|---|
| स्वामी : एक शोध | मीरा घांडगे | १५०/- |

## नाटक

| | | |
|---|---|---|
| श्रद्धा | विद्याधर पुंडलिक | ५०/- |
| कुणीकडून कुणीकडे | विद्याधर पुंडलिक | ४०/- |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| हितोपदेश - मनोरंजक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश - प्रेरक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश - बोधपर | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश - रोचक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| सैनिक हो तुमच्यासाठी | आनंद यादव | २०/- |

## शिक्षण

| | | |
|---|---|---|
| मूल्यशिक्षण | डी. एस. कांबळे | ७०/- |

## विज्ञान

| | | |
|---|---|---|
| शरीरातील विविध संस्था | | |
| भाग १ | अनु. वैशाली जोशी | २५/- |
| भाग २ | अनु. वैशाली जोशी | २५/- |
| भाग ३ | अनु. वैशाली जोशी | २५/- |



| | | |
|---|---|---|
| चला प्रयोग करु या | | |
| मोजमापे | मीना किणीकर | २०/- |
| ध्वनी | मीना किणीकर | २०/- |
| गतीचलन | मीना किणीकर | २०/- |
| हवास्थिती | मीना किणीकर | २०/- |
| अवकाश | मीना किणीकर | २०/- |
| पदार्थ | मीना किणीकर | २०/- |
| हवा | मीना किणीकर | २०/- |
| रसायने | मीना किणीकर | २०/- |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २०/- |
| अन्न | मीना किणीकर | २०/- |
| उष्णता | मीना किणीकर | २०/- |
| उर्जा | मीना किणीकर | २०/- |
| तंत्रज्ञानाचे विश्व | | |
| माहिती प्रसार साधने, दळणवळण/वाहतूक | निरंजन घाटे | २०/- |
| संगणक, यंत्रमानव | निरंजन घाटे | २०/- |
| मानवी युद्धसाधने, लेझर्स | निरंजन घाटे | २०/- |

## कविता

| | | |
|---|---|---|
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार | माधव मोर्डेकर | २००/- |
| शिलंगणाचं सोनं | कुमार केतकर | २५०/- |

# २००० सालातील नवीन आवृत्त्या

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत | आवृत्ती |
|---|---|---|---|
| **कादंबरी** | | | |
| स्वामी | रणजित देसाई | ९० | २१ |
| राधेय | रणजित देसाई | १०० | १० |
| पावनखिंड | रणजित देसाई | १०० | ४ |
| माझा गाव | रणजित देसाई | १५० | २ |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९० | ८ |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५ | ४ |
| देव जो भुवरी चालिला | अनु. लीना सोहोनी | १०० | २ |
| पर्व | अनु. उमा कुलकर्णी | २५० | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| चीपर बाय द डझन | अनु. मंगला निगुडकर | १०० | ४ |

## कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| प्रपात | रणजित देसाई | ९० | २ |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५ | ४ |
| पाकळ्या | वि. स. खांडेकर | ७० | ४ |
| हिरवळ | वि. स. खांडेकर | ५० | ३ |
| ढगाआडचे चांदणे | वि. स. खांडेकर | ६० | ५ |
| घरजावई | आनंद यादव | १०० | ४ |
| मोडेन पण वाकणार नाही | व. पु. काळे | ७० | ६ |

## काव्य

| | | | |
|---|---|---|---|
| वर्षा | शान्ता ज. शेळके | ७० | २ |
| कोंडवाडा | दया पवार | ४० | ४ |

## ललित

| | | | |
|---|---|---|---|
| माझं माझ्यापाशी | व. पु. काळे | १०० | २ |
| आपण सारे अर्जुन | व. पु. काळे | ८० | ५ |
| सांगे वडिलांची कीर्ती | व. पु. काळे | ७० | ५ |
| लाईफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२० | ३ |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० | २ |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ७० | २ |
| शेलका साज | शिवाजी सावंत | १२० | ३ |

## प्रवास

| | | | |
|---|---|---|---|
| माझं लंडन | मीना प्रभु | २२५ | ४ |
| दक्षिणरंग | मीना प्रभु | २५० | २ |

## अनुभवकथन

| | | | |
|---|---|---|---|
| इट्स ऑलवेज पॉसिबल | अनु. लीना सोहोनी | २५० | १ |

## चरित्रे/व्यक्तिचित्रे

| | | | |
|---|---|---|---|
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६० | २ |
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५० | ६ |
| बिझिनेस महाराजे | अशोक जैन | २५० | २ |

## वैचारिक

| | | | |
|---|---|---|---|
| युगंधर श्रीकृष्ण | शिवाजी सावंत | ६० | २ |
| एक एक पाऊल (ओशो) | अनु. भारती पांडे | ८० | २ |
| हसत खेळत ध्यानधारणा | अनु. मीना टाकळकर | ७० | २ |
| मी धार्मिकता शिकविता, धर्म नाही | अनु. मृणालिनी गडकरी | ९० | २ |



## राजकीय

| | | | |
|---|---|---|---|
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | २५० | ४ |

## सामाजिक

| | | | |
|---|---|---|---|
| जाती-जमाती | रामनाथ चव्हाण | ९० | ३ |

## मार्गदर्शन

| | | | |
|---|---|---|---|
| बुद्धिबळ शिका | ना. रा. वडनप | १०० | ४ |
| एक विजयपथ | अविनाश धर्माधिकारी | १५० | ४ |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर म्हाम्बरे | ९० | २ |
| ध्यानसूत्र | माधव कर्वे | १०० | २ |
| छंदातून विज्ञान | डी. एस. इटोकर | ६० | ४ |
| सभेत कसे बोलावे | शाम भुर्के | ५० | ५ |
| नागरिक | अविनाश धर्माधिकारी | १५० | २ |
| मुलांवरचे संस्कार | श. व्य. काश्यपे | ८० | ३ |

## नाटक

| | | | |
|---|---|---|---|
| गगनभेदी | वसंत कानेटकर | ६० | २ |
| अखेरचा सवाल | वसंत कानेटकर | ५० | ४ |
| जिथे गवतास भाले फुटतात | वंसत कानेटकर | ६० | २ |
| आकाशमिठी | वसंत कानेटकर | ६० | २ |

## विज्ञान

| | | | |
|---|---|---|---|
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३० | ३ |

## आरोग्य

| | | | |
|---|---|---|---|
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५० | ४ |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | १५० | ३ |

## पाकशास्त्र

| | | | |
|---|---|---|---|
| रुचिरा भाग-१ | कमलाबाई ओगले | ९० | ३६ |
| रुचिरा भाग-२ | कमलाबाई ओगले | ९० | ११ |

## शेतकी

| | | | |
|---|---|---|---|
| सुंदर आपली फळबाग | आ. बा. पाटील | ८० | ३ |
| बोन्साय | आ. बा. पाटील | ७५ | २ |
| विपुलाच सृष्टी | श्री. अ. दाभोळकर | ६५ | ६ |
| आधुनिक द्राक्ष लागवड | श्री. अ. दाभोळकर | ७० | ५ |

## संदर्भ

| | | | |
|---|---|---|---|
| मराठीचे व्याकरण | लीला गोवीलकर | २२५ | ३ |
| मराठी व्याकरण परिचय | राजशेखर हिरेमठ | ८० | ३ |

## २००१ मधील प्रकाशित नवीन पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| कांचनगंगा | माधवी देसाई | १५०/- |
| इथे फुलांना मरण जन्मता | द. ता. भोसले | ८०/- |
| ज्युरॅसिक पार्क | अनु. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| क्रोमोझोम - ६ | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द मिरॅकल | अनु. जयवंत चुनेकर | ३००/- |
| द लास्ट डॉन | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| **कथासंग्रह** | | |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| **ललितगद्य** | | |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| **वैचारिक** | | |
| नवी पहाट : ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १००/- |
| ख्यातनाम इतिहासकार | अनु. सुधा नरवणे | १५०/- |
| **संकीर्ण** | | |
| कारगिलनामा | अनु. नारायण आवटी | १६०/- |
| कोटिमोलाची प्रश्नोत्तरे | उमा खरे | ७०/- |
| **आत्मचरित्र** | | |
| आमार मेयेबेला (तसलिमा नासरिन) | अनु. मृणालिनी गडकरी | २००/- |
| **आरोग्यविषयक** | | |
| अक्षय सुखाचे वरदान - रेकी | नीलम दोशी | ६०/- |
| **विज्ञानविषयक** | | |
| जिज्ञासापूर्ती | निरंजन घाटे | १५०/- |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २००/- |
| नामशेष झालेले प्राणी | किशोर पवार | ५०/- |
| **काव्य** | | |
| वारा आणि कमळ | मीरा | ६०/- |
| **संदर्भ** | | |
| स्वामी : एक शोध | संपा. डॉ. मीरा घांडगे | १५०/- |



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २००१
◆ वर्ष पहिले
◆ अंक चौथा

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय -** | २ |
| **साहित्यवार्ता** | ४ |
| **पुरस्कार** | २० |
| **श्रद्धांजली** | २५ |
| **पुस्तक परिचय** | |
| आमार मेयेबेला | २६ |
| कांचनगंगा | ३४ |
| द कंपनी ऑफ विमेन | ३८ |
| **माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथ व ग्रंथालयांवर परिणाम** | ४१ |
| **शब्दकोडे** | ४३ |
| **स्पर्धा निकाल** | २४ |

- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*